# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २८ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







# शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा : देवेंद्र फडणवीस

## जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्यांना दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारणार

मुंबई,दि.२८: महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करा. १५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.शासनाचा विभाग १५ ऑगस्टपर्यंत जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासात समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिन निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,माहिती व तंत्रज्ञान मंत्री ड आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव,ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय,राज्य सेवा हक्क कोकणचे आयुक्त बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सध्या हजार पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाइन दिलेल्या आहेत. अजून ३०० सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाइन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन करा.१५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.जो शासनाचा विभाग १५ ऑगस्ट पर्यंत झाली नाही त्या विभागातील प्रत्येक सेवेकरिता दर दिवशी प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत अधिकार आपल्या संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत.गेल्या दहा वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत.मंत्रालयात चेहरा पडताळणी पमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये इज ऑफ लिविंग आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.शासनाची सर्व सेवा व्हॉटसप वर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होवून लोकांचे जीवनमान सुसह्य होईल असेही ते म्हणाले.

**लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना : एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाहीत लोकांसाठी कर्तव्य भावनेने काम करायचे असते. लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना आहे असं आपण म्हणतो या वाक्याला लोकसेवा हक्क आयोगाने खरा अर्थ मिळवून दिला आहे.हा कायदा म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची गंगोत्री आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम वर्धा,यवतमाळ आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवले त्यांचा आताच सत्कार करण्यात आला.अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही काम केले जावे. खर तर जिथे समाजाला त्यांचे सर्व हक्क आणि अधिकार त्यांना सेवा दिल्या जातात तिथे प्रगती अटळ असते.हा कायदा प्रशासन व नागरिकांमधला विश्वासाचा एक पूल आहे असं म्हटलं तर वावग ठरणार नाही आणि म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सक्षमीकरणाचा हा पाया अधिक मजबूत होईल आणि या अधिनियमच्या माध्यमातून लोकांना तात्काळ सेवा मिळतील असेही ते म्हणाले.

*महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमच्या माध्यमातून अधिक सेवा देणार : मुख्य सचिव सुजाता सौनिक*

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्याकी,अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला ऑनलाईन सेवा देण्यासाठी आयोग नक्कीच प्रभावी अंमलबजावणी करेल. मायक्रोसॉफ्ट सोबत देखील आपण यासाठी करार केला आहे.महाराष्ट्र डिजिटल गव्हर्नन्स मध्ये देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी वर्ध्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा सेवादूत प्रकल्पाची सुरुवात केल्याबद्दल,यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी अभिप्राय कक्ष सुरू केल्याबद्दल कोल्हापूर चे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी कोल्हापूर जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प सुरू केल्याबद्दल माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमचे ब्रँड अँबेसिडर म्हणून पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी यांना यावेळी घोषित करण्यात आले. यावेळी राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी आयोगाची गेल्या दहा वर्षातील वाटचालीचा आढावा घेतला.या कायद्याच्या जनजागृतीसाटी आयोग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार असून भविष्यात आयोगाने हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती यावेळी दिली. पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी आभार मानले.

## ‘त्या’ पाकिस्तानी नागरिकांना देश सोडावा लागणार नाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्वाची माहिती

पुणे: पहलगाम हल्ल्यानंतर भारतातील पाकिस्तानी नागरिकांना ताबडतोब देश सोडण्याचे निर्देश सरकारने दिले जरी असले तरी, काही नागरिकांना भारत सोडण्याची गरज नाही, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी माहिती दिली.

भारत सरकारने दिलेल्या निर्देशानुसार, पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा काल दि २७ एप्रिलपासून रद्द झाले आहेत. त्याचप्रमाणे पाकिस्तानी नागरिकांना दिलेले वैद्यकीय व्हिसा देखील २९ एप्रिलपर्यंतच वैध असतील. परराष्ट्र मंत्रालयाच्या आदेशानुसार व्यवसाय, चित्रपट, पत्रकार, स्थलांतर, परिषद, पर्वतारोहण, विद्यार्थी, अभ्यागत, पर्यटक आणि तीर्थयात्रेसाठी व्हिसा असलेल्यांना देखील भारतात आता राहता येणार नसून, आजपासून कुठल्याही पाकिस्तानी नागरिकाला नवीन व्हिसा जारी केला जाणार नाही. असे असले तरी, काही पाकिस्तान नागरिकांना भारतात राहण्याची मुभा असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

नेमके काय म्हंटले देवेंद्र फडणवीस?

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार ज्या पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडावे, असे म्हटले आहे, ते महाराष्ट्रात असणारे सर्व नागरिक सापडले आहेत. पाकिस्तानी नागरिक भारताबाहेर गेले पाहिजे, त्या सर्वांना सांगितले गेले आहे. परंतु सिंधी समाजाचे लोक दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहे. त्यामुळे त्यांना भारत सोडण्याचे कारण नाही. जे पाकिस्तानी नागरिक शॉर्ट टर्म व्हिसावर आले आहे, त्यांना देश सोडावे लागणार आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांपैकी १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता झाल्याचे आढळून आले. १०७ पाकिस्तान्यांचा पोलीस वा अन्य संस्थांना पत्ताच लागत नाही, असे वृत्त माध्यमांत झळकले होते. त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

राज्यात एकही पाकिस्तानी नागरिक राहणार नाही– देवेंद्र फडणवीस

मी आपल्याला गृहमंत्री म्हणून सांगतोय, यावर उलट्या–सुलट्या बातम्या करू नका. एकही पाकिस्तानी नागरिक हरवला नाही. जेवढे पाकिस्तानी आहेत ते सर्व सापडले आहेत.

## रायगड जिल्ह्यात वणव्यांमुळे तीन हजार हेक्टर वनक्षेत्राची हानी

### मागील पाच वर्षांत लागले एक हजार वणवे; ९० टक्के मानवनिर्मित; वनसंपदेला वाढता धोका

अलिबाग : वणव्यांमुळे रायगड जिल्ह्यातील वनसंपदा सध्या धोक्यात आली आहे. पाच वर्षांत एक हजार वणवे लागले असून, त्याची ३ हजार ७१ हेक्टरवरील वनक्षेत्राला वणव्यांची झळ बसली आहे. या वणव्यातील ९० टक्के वणवे हे मानवनिर्मित असून, वणव्यांमुळे नैसर्गिक साधन संपत्तींची, हानी होत आहे. त्याचबरोबर जंगलातील पशुपक्ष्यांचे अस्तित्वही धोक्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात ३५ हजार हेक्टर खासगी, तर १ लाख ७ हजार हेक्टर सरकारी वनक्षेत्र आहे. यात माथेरानसह फणसाड आणि कर्नाळा अभयारण्य परिसराचाही समावेश आहे. अत्यंत दुर्मीळ वन्य प्रजाती येथे वास्तव्य करतात. हिवाळ्याच्या शेवटी आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला जंगलांना वणवे लागण्याचे प्रकार सुरू होतात. यामुळे वनसंपत्तीची मोठी हानी होते. मागील पाच वर्षांचा विचार करता, २०१८–१९ मध्ये वणव्याच्या जिल्ह्यात २०७ घटना घडल्याने ८८७ हेक्टर वनक्षेत्र बाधित झाले. २०१९–२० मध्ये वणव्याने तब्बल १७४ घटना घडल्या. यात ५७१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. २०२०–२१ मध्ये डिसेंबर अखेर वणव्याने १३४ घटनांची नोंद झाली. यात ३०६ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील वनसंपदा बाधित झाली. २०२१–२२ मध्ये ३५५ वणवे लागल्याने त्यात ७०३ हेक्टर वनक्षेत्राचे नुकसान झाले. २०२२–२३ मध्ये ३५५ वणवे लागले, तर २०२३–२४ मध्ये १५५ वणवे लागले. ज्यात २८६ हेक्टर वनक्षेत्राचे नुकसान झाले, तर २०२४–२५ मध्ये ९५ वणवे लागण्याच्या घटना समोर आल्या, ज्यात २०० हून अधिक हेक्टर वनक्षेत्र बाधित झाले आहे.

अनियंत्रित वणवे आता जंगलालगतच्या गावात शिरण्याच्या घटना मागील काही वर्षांत समोर आल्या आहेत. वणव्यांमुळे प्रदेशनिष्ठ वनस्पती धोक्यात येत आहे. यात प्रामुख्याने गवताळ कुरणे, दगडफूल, सोनकी प्रकार, कारवी जाती, पानफुटी, कलारगा झाडी, तेरडा, श्वेतांबरी, रानआले, सोनजाई, गजकर्णिका, रानकेळी, सापकांदा, टोपली कारवी, कुळी कापुरली संजीवनी, सर्पगंधा, अश्वगंधा यांसारख्या वनस्पतींचा समावेश आहे, तर घुबड, चंडोल, रॉबिन रानकोंबड्या, मोर, सापांच्या प्रजाती गवतावरील कीटक, उंदीर, भेकरे यांसारख्या पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पूर्वी मुबलक प्रमाणात आढळणारे वन्यजीव आता दिसेनासे होत चालले आहेत. कोकणात १८४ प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजातीही वणव्यांमुळे अडचणीत सापडल्या आहेत.

वणव्यामुळे पशुपक्ष्यांचे अधिवास नष्ट होतो, एकदा अधिवास नष्ट झाल्यास वनजीवांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण होते. त्यामुळे वन्यजीव या परिसरातून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सातत्याने लागणारे वणवे रोखणे गरजेचे आहे. लोकांमधील गैरसमज दूर करण्यासाठी प्रबोधन करणे आणि वणवे रोखण्यासाठी लोकसहभाग वाढवणे, आवश्यक आहे अन्यथा कोकणातील सदाहरीत वनांचे अच्छादन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.

स्थानिकांमध्ये असलेला गैरसमजातून हे वणवे लावले जातात. जंगलांना वणवे लावले की, पुढील वर्षी जंगलात चांगले गवत उगवते. हे गवत जनावरांच्या चाऱ्यासाठी उपयुक्त ठरते. म्हणून दरवर्षी उन्हाळ्यात जंगलांना आगी लावल्या जातात. दुसरीकडे सरपणाला लाकूड मिळावे, म्हणूनही वणवे पेटवले जातात. वणव्यांमुळे झाडे सुकतात आणि पर्यायाने हे लाकूड सरपणासाठी तोडली जातात. कधी कधी शिकारीसाठीही हे वणवे लावले जातात. वणवा लागल्याने वन्यजीव आगीच्या विरुध्द दिशेने पळण्यास सुरूवात करतात. याचवेळी दबा धरून बसलेले शिकारी वन्यजीवांची सावज टिपतात.

वनविभागाकडून उपाययोजना

जिल्ह्यात वनक्षेत्र खूप जास्त आहे. पण त्या तुलनेत वनविभागाकडे असणारा कर्मचारी वर्ग अतिशय कमी आहे. त्यामुळे उपलब्ध कर्मचारी वर्गाचा वापर करून वनसंवर्धनाचे काम केले जात आहे.

## पाकिस्तानी युट्यूब चॅनल बंदी नंतर ‘बीबीसीला’ इशारा

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्यानंतर भारत– पाकिस्तानात तणावपूर्ण वातावरण आहे. हे संबंध आणिखी ताणले जाऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर आता सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. हे प्रकरण अधिक चिघळू नये म्हणून सरकारकडून दक्षता घेण्यात येत आहे.

सरकारने म्हणलं आहे की, बीबीसीसह सर्व विदेशी वाहिन्यांनी हे लक्षात ठेवावे की, त्यांना भारतात प्रसारण करण्याचा त्यांचा परवाना हा त्यांना दिलेला एक विशेषाधिकार आहे. मात्र हा अधिकार मिळाला असला तरी देखील देशातील नियम आणि कायदे पाळणे त्यांना बंधनकारक आहे. मात्र तरी देखील तुम्ही तुमचे पुर्वग्रह देशात पसरवत असाल तर तुम्हाला भारतात प्रसारण करण्याचा तुमचा अधिकार नाकारण्यात येऊ शकतो.

केंद्र सरकारकडून ६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. कारण बीबीसीकडून पहलगाम दुर्घटनेनंतर प्रसिद्ध झालेल्या एका लेखामध्ये बीबीसीने भारतीयांचे व्हिसा पाकिस्ताने निलंबित केले असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी दहशतवाद्यांना दहशतवादी नाही तर उग्रवादी म्हटलं आहे. मात्र हे उग्रवादी नसून दहशतवादीच होते. जे पाकिस्तानमधून आल्याचं देखील सांगितलं जात आहे. देशभर संतापाची लाट उसळली आहे. त्यात बीबीसीने मात्र वेगळी भूमिका घेतल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या शिफारशींनुसार १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केले आहेत. प्रक्षोभक आणि सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील सामग्री पसरवल्याबद्दल एकूण ६.३ कोटी सबस्क्राइबर असलेल्या सोळा पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर भारतात बंदी घालण्यात आली आहे.

## जिल्ह्यातील जुन्या कालव्यांच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही– राधाकृष्ण विखे

अहिल्यानगर, दि.२७ – महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील जुन्या असलेल्या कालव्यांच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचे प्रस्ताव तयार करण्यात यावेत. यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत (एम. आय. पी.) टप्पा १ मधील मुळा प्रकल्पांतर्गत मुळा उजवा कालवा व वितरण व्यवस्था कामांची दुरुस्तीच्या कामाचे भूमिपूजन पालकमंत्री श्री. विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमास आमदार शिवाजी कर्डिले, आमदार विठ्ठल लंघे, आमदार मोनिका राजळे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार पांडूरंग अभंग, सुभाष पाटील, नामदेव ढोकणे, बाळकृष्ण बानकर, सुवर्णा बानकर, देवीदास म्हस्के, मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता, राजेश गोवर्धने, बाळासाहेब शेटे, मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील आदी उपस्थित होते.



पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, मुळा धरणाच्या लाभक्षेत्रासाठी वरदान ठरणाऱ्या मुळा उजव्या कालव्याच्या नूतनीकरणाच्या कामासाठी ११० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामातून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडणार आहे. वेगवेगळ्या उपक्रमातून उपलब्ध सिंचनातून अधिकाधिक क्षेत्राला प्रभावीपणे पाणी देत वितरण व्यवस्था सुधारण्यावर जलसंपदा विभागामार्फत भर देण्यात येत आहे. मुळा धरणातील गाळ काढण्याच्या कामास सुरुवात करण्यात येणार असून धरणावर फ्लॅपवॉल बांधण्यात येणार आहेत. यामुळे सुमारे ३ टीएमसी अतिरिक्त पाणी वाढणार असल्याचेही ते म्हणाले.

१५ ते ३० एप्रिल दरम्यान जलव्यवस्थापन कृती पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमातून गावोगावी शेतकरी, नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहेत. या सर्व सूचनांना एकत्रित करून सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

पाण्याचे संकट दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. यावर उपलब्ध सिंचनातून अधिकाधिक क्षेत्राला प्रभावीपणे पाणी देत वितरण व्यवस्था सुधारण्यावर भर देण्यात येत आहे. वाढते सिंचनक्षेत्र तसेच उपलब्ध सिंचनाची क्षमता यातून शेतीला मुबलक पाणी पुरवठ्यासाठी धरणामधून चाऱ्याद्वारे पाणी पुरवठ्याऐवजी बंद पाईपलाईनद्वारे दिल्यास ते अधिक उपयुक्त ठरणार आहे.यामुळे पाण्याची होणारी गळती थांबून शेवटच्या टेलपर्यंत पुरेसे पाणी पोहोचवता येईल. यासाठी जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी नागरिकांशी संवाद साधून बंद पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठ्यासाठी समंती घेण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

पहेलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा निषेध व्यक्त करत पालकमंत्री म्हणाले, घडलेली घटना अत्यंत निंदनीय आहे. जम्मू–काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यानंतर शांतता प्रस्थापित झाली होती. त्या ठिकाणी मोठ्या बाजारपेठा उभारण्याबरोबरच तरुणांचा हाताला रोजगार मिळू लागला होता. देश स्वातंत्र्यानंतर गतवर्षी ४० लक्ष पर्यटकांनी या भागाला भेट दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची विकासाची घोडदौड अत्यंत वेगाने सुरू आहे. प्रत्येक भारतीयांच्या मनात घटनेबद्दल प्रचंड संताप आहे. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यंतीबद्दल संवेदना व्यक्त करत संपूर्ण देश या कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे सांगत आपला देश या कारवायांना सडेतोड उत्तर देईल, असेही ते म्हणाले.

आमदार शिवाजी कर्डीले म्हणाले, मुळा धरणातील पाण्याचा अधिक प्रमाणात पिण्यासाठी करण्यात येतो. पाईपलाईनद्वारे पाण्याच्या पुरवठा केल्यास पाणी गळती थांबून लाभधारकाना याचा मोठा लाभ होईल. मुळा धरणातील गाळ काढण्याबरोबरच धरणाची उंची वाढवल्यास धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याचा संचय होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांना सुरळीत व अखंडितपणे वीज मिळावीते म्हणाले.

आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, अनेक वर्षांपासून मुळा कालव्याच्या दुरुस्तीचे प्रलंबित असलेले काम पालकमंत्री यांच्या माध्यमातून मार्गी लागले आहे. या कामांमुळे कमी कालावधीत अधिक सिंचन यातून निर्माण होणार आहे. शेवगाव पाथर्डी मतदार संघातील लाभधारकाना कायमस्वरूपी पाणी मिळावे. होणारी कामे गुणवत्तापूर्ण व्हावीत, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले, नेवासा मतदार संघात ४५ ते ५० कोटी रुपयांची दुरुस्तीची कामे या माध्यमातून करण्यात येणार असून मतदार संघातील लाभधारकाना याचा मोठा लाभ होणार आहे. जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यातही अनेक कामे मार्गी लागली असल्याचे ते म्हणाले.

अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने म्हणाले, ११० कोटी रुपयांच्या निधीतून ही दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. १५७ बांधकामे व दुरुस्ती तसेच काही ठिकाणी नव्याने बांधकाम याअंतर्गत करण्यात येणार आहे. आधुनिक पद्धतीचा वापर करून करण्यात येणाऱ्या या कामांमुळे सुमारे २.२ टीएमसी पाण्याची बचत होऊन साडेपाच हजार हेक्टर एवढं क्षेत्र पुनर्स्थापित जाणार आहे. लाभक्षेत्रातील गावांच्या सिंचनाच्या अडचणी या माध्यमातून सुटणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी

# सेल्फ सर्व्हे करून घ्या-आ.संदीप क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस-२०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

काही अडचण असल्यास संपर्क साधा

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.

# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

## नाव नोंदणी करण्याचे आवाहन: भिक्खु धम्मशिल थेरो

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**



तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पालकांनी आपल्या १५ वर्षावरील मुलांचे नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

नाव नोंदणीसाठी संपर्क

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# रक्तदान शिबिर आयोजनातील पेशवा प्रतिष्ठानचे सातत्य कौतुकास्पद-डॉ.नितीन चाटे

**पेशवा प्रतिष्ठान तर्फे आयोजित रक्तदान शिबिरात ४२ जणांचे रक्तदान**



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ एप्रिल**

अंबाजोगाई येथे भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त २००९ पासून दरवर्षी रक्तदान शिबिराची आयोजन पेशवा प्रतिष्ठान तर्फे करण्यात येते. रक्तदान शिबिराचे आयोजन हे एक विधायक कार्य असून पेशवा प्रतिष्ठान यांनी राखलेले सातत्य कौतुकास्पद असल्याचे मत डॉ.नितीन चाटे यांनी व्यक्त केले. भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. चाटे बोलत होते. यावेळी डॉ अमित लोमटे, डॉ चेतन आदमाने, डॉ सुधीर धर्मपात्रे, डॉ ओंकार ताथोडे, डॉ कौस्तु कुलकर्णी उपस्थित होते. डॉ.अमित लोमटे म्हणाले की, समाजातील गरजूंना मदत करणे हे सर्वात मोठे सामाजिक कार्य असून अनेकदा रक्ताचा तुटवडा असतो ,त्यामुळे काही रुग्णांना जीव गमावण्याची वेळ येते परंतु समाजातील सामाजिक संघटना रक्तदान शिबिराचे आयोजन करून एक चांगले कार्य करत आहेत. या शिबिरास माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, गणेश मसाने , पद्माकर सेलमोकर, संजय देशपांडे , महेश राडकर, आनंद टाकळकर सह अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. या शिबिरात डॉ. महेश अकोलकर, पार्थ कुलकर्णी, केदार दामोशन, डॉ संकेत तोरंबेकर , डॉ.मिलिंद कळंब, आश्लेषा कळंबकर ,शिरीष हिरळकर, श्रीकांत जोशी, राहुल कुलकर्णी, रेवती कुलकर्णी, स्वप्ना देशपांडे, प्रमोद नांदगावकर, कविता कुलकर्णी, सचिन भातलवंडे, विशाल जहागीरदार, सुजित विडेकर ,केदार वारकरी, शैलेश दीक्षित, सारंग इवरकर, वैशाली देवगावकर, प्रज्ञा देवगावकर, कृष्णा कुलकर्णी, शिवम वाळके, वामन मुळी, प्रदीप रेनापुरकर, किशोर जोशी , सुजत दीक्षित, वामन खोत, वल्लभ पिंगळे, डॉ अभिजीत सर्वज्ञ, मनोज काटे, ध्यानेश कुलकर्णी, स्वरदा ढोले, आनंद जोशी, नारायण शिरसाट,नवनाथ जोशी,पद्मनाभ औसेकर,सागर दीक्षित, गणेश देशमुख,श्रीराम रामदासी, बालाजी शिंदे, शंकर कदम, यांनी रक्तदान केले .रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विवेक बाबुळगावकर, केदार दामोशन, पार्थ कुलकर्णी, अविनाश लहुरीकर, गौरव कुलकर्णी, अक्षय देशमुख ,अनिता औटी, रेणुका भालेराव, स्मिता भातलवंडे , मोहिनी कळंबकर, मयुरी तोरंबेकर , साधना विर्धे यांच्यासह रक्तपेढीतील डॉ सबुरी शिंदे, सुवर्णा अरगडे, जगदीश रामदासी, मुस्कान, वाल्मीक कांबळे, आनंद सीताप,नितीन देवकर यांनी सहकार्य केले.

शिबिराचे उद्घाटक यांनी केले रक्तदान... या रक्तदान शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून डॉ अमित लोमटे यांना आमंत्रित केले होते. यावेळी डॉ अमित लोमटे यांनी रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले.

# बीड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा जीपीएफ सुरू करा

**कर्मचारी संघटनेचे शिक्षण उपसंचालकांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ एप्रिल**



१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा जीपीएफ तात्काळ सुरू करावा अशी मागणी राज्य अंशतः अनुदान प्राप्त २००५ पूर्वी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचेकडे निवेदनाव्दारे दि. २४ गुरूवारी करण्यात आली आहे.

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के आलेल्या कर्मचा-यांची नियमीत जीपीएफ कपात सुरू आहे तर काही कर्मचाऱ्यांची जीपीएफ कपात बंद आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे बीड जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक व संबंधित वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयास आदेशित करावे अशी मागणी करण्यात आली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश गवते, प्रा. पठाण, प्रा. जाधव, प्रा. जयप्रकाश मलवाडे यांची उपस्थिती होती.

# क्रांतिसूर्य बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने किट्टी आडगाव येथे बौद्ध मूर्ती विहारास भेट

## २०३० पर्यंत संपूर्ण माजलगाव तालुक्यात मूर्ती देण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ एप्रिल :**

बौद्ध जयंतीच्या निमित्ताने क्रांतिसूर्य बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने किट्टी आडगाव येथील बौद्ध विहारास बुद्ध मूर्ती भेट म्हणून देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे प्रमुख विश्वस्त स्वप्नील स्वामी, राज सोनवणे, नंदकिशोर निसर्गंध यांनी दिली.

संस्थेने मागील वर्षी सावरगाव येथेही बौद्ध मूर्ती भेट दिली होती. या उपक्रमाला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने आता २०३० पर्यंत संपूर्ण माजलगाव तालुक्यातील प्रत्येक बौद्ध विहारात बुद्ध मूर्ती देण्याचा भव्य संकल्प केला आहे.हा उपक्रम केवळ धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीने नव्हे तर बौद्ध संस्कृतीच्या जागृतीसाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. किट्टी येथील बौद्ध विहारात मूर्ती स्थापनेसाठी विशेष पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.





कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी प्रयत्न करत असून मार्गदर्शक प्रा.संजय बागुल, प्रा.सुदर्शन स्वामी, लक्ष्मण पोटभरे कपिल डोंगरे, धम्मानंद बोराडे सर बाबासाहेब जाधव, कैलास टाकणखार, चंद्रमुनी डोंगरे. संघर्ष डोंगरे मार्गदर्शन करत आहेत. तर कार्यक्रमाचे आयोजक अशोक मगर, शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, संकेत लांडगे, संदेश डोंगरे, दिनेश निर्गंध, प्रवीण ओव्हाळ, स्वप्नील स्वामी, सदानंद भैया प्रधान, आजिनाथ लोखंडे, केतन प्रधान, राज सोनवणे, संजोग कसबे, दत्ता सरवदे, राहुल वाघमारे, डॉ. सुहास टाकणखार, दीपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निर्गंध, सचिनदादा टाकणखार, संदेश लांडगे, रविकिरण टाकणखार, नवनाथ टोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर, विलेश कांबळे, बबीराम माने, मुनाजी तुपसुंद्रे, राज कुमारात, नंदकिशोर निर्गंध, रोहन टाकणखार, सुहास टाकणखार, आरव जोगदंड, ऋषिकेश सोनवणे, विशाल सोनवसारे, सुजन खळगे, दीपकदादा गायकवाड , सचिन कराळे, सुजल खळगे, रवीराज भारतसिंह, प्रमोद भद्रे, मिलिंद भागवत, बळीराम जाधव, सिद्धार्थ साळवे, राहुल धाइजे, मानव पोटमारे, शशिकांत घनशामदास, अनिल भारते, उत्कर्ष शिंदे, नवतरस प्रधान, अविनाश गायकवाड , सचिन सिरसट, संजय साळवे, रमेश बल्लाळ बबलू फंदे, प्रवीण कुव्हारे सुशिल बोराडे, उत्कर्ष शिंदे. विशेष सहकार्य किसान मामा भद्रागे, अमर साळवे, रवी उघडे, सुहास बोराडे, अरविंद ओव्हळ, रवी राऊत, दत्ता येवले, अजिंक्य वाघमारे यांचे आहे. संस्थेच्या या दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिजामाता विद्यालयची दखल राज्यपातळीवर

## 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात पटकावले एक लाखांचे पारितोषिक!

**परळी वैजनाथ (श्रीराम लांडगे)...**

शिक्षण, संस्कार आणि सौंदर्य यांचा मिलाफ साधत, जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धर्मापुरी या शाळेने मुख्यमंत्री, माझी शाळा सुंदर शाळा या राज्यस्तरीय अभियानात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात तालुक्यातील दखलपात्र शाळा म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या शाळेला एक लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले असून, हे यश संपूर्ण परळी तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.

शाळेचे प्राचार्य रामहरी गित्ते सर यांच्या नेतृत्वाखाली, आणि संस्था सचिव मा. विजयकुमार गौतमराव बापू नागरगोजे तसेच संचालिका डॉ. सरस्वती विजयकुमार नागरगोजे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने हे यश घडून आले. या अभियानांतर्गत राज्य सरकारने दिलेले विविध शैक्षणिक, भौतिक आणि व्यवस्थापकीय निकष पूर्ण करत जिजामाता विद्यालयाने आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले.



शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांचे समर्पण, सातत्यपूर्ण मेहनत व संघभावना यामुळे हे यश शक्य झाले. जर काही करायचं ठरवलं तर यश नक्कीच मिळतं हे या विद्यालयाने कृतीतून सिद्ध केले आहे.

जाहिरातबाजीच्या युगात देखील या शाळेने शांत, सातत्यपूर्ण आणि सेवा-भावनेतून केलेले कार्य हीच त्यांची खरी ओळख बनली आहे. या यशामुळे परिसरातील इतर शैक्षणिक संस्थांनाही प्रेरणा मिळणार आहे.

राज्य शासनाने 'सुंदर, स्वच्छ, सुशोभीत व गुणवत्तापूर्ण शाळा' घडवण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमात अनेक निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता, शाळेचे डिजिटायझेशन, परिसराचे सौंदर्यीकरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती, पालक सहभाग, शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य, पर्यावरणपूरक उपक्रम व सामाजिक सहभाग अशा विविध घटकांचा समावेश होता.

आपली शाळा उत्तम कामगिरी करत असल्याची दखल घेत शासनाने तालुकास्तरावर निवड करून एक लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर केले. हे पारितोषिक परळी वैजनाथ गट साधन केंद्राचे साधन व्यक्ती बालासाहेब दहिफळे सर यांच्या हस्ते शाळेचे प्राचार्य रामहरी गित्ते यांना सुपूर्त करण्यात आले.

या यशाबद्दल संस्था सचिव मा. विजयकुमार नागरगोजे, संचालिका डॉ. सरस्वती नागरगोजे, तसेच संचालक मंडळ, माजी विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमींनी मनःपूर्वक अभिनंदन करून शाळेच्या पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या यशामागे प्रत्येकाचा समर्पण आणि मेहनत !

जिजामाता विद्यालयाची ही निवड ही प्रत्येक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे प्रतिक आहे. 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानामध्ये आम्ही राज्य स्तरावर ओळख मिळवली, हे आमच्या शाळेच्या कुटुंबाच्या जिद्द आणि एकतेचे फलित आहे. आम्ही नेहमीच शाळेचे वातावरण, शिक्षण आणि सुविधा सुधारण्यासाठी सतत काम करत राहू, आणि यापुढेही शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी आमची ही प्रेरणा कायम राहील.

(विजयकुमार गौतमराव बापू नागरगोजे- सचिव)


शाळेचे यश म्हणजे शाळेच्या कुटुंबाची जिद्द आणि एकता!

शाळेचे यश हे केवळ एक पारितोषिक नाही, तर आपल्या कुटुंबाची एकजूट, मेहनत आणि समर्पण याचे प्रतीक आहे. 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानातील निवडीने आमच्या शाळेची कामगिरी, शिक्षणातील गुणवत्ता आणि सौंदर्याचा एक अभिमानजनक ठसा ठेवला आहे. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी यांच्या मेहनतीने हा मोठा आदर्श साकारला आहे. यशाच्या या मार्गावर प्रत्येक प्रयत्न हा शाळेच्या सर्वोत्तम भविष्यासाठी आहे.

- डॉ. सरस्वती विजयकुमार नागरगोजे (संचालिका)

# डॉ.ऋषिकेश आंधळे वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**



सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत लिबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून खंडाळा येथील डॉ.ऋषिकेश सर्जेराव आंधळे रुजू झाले आहेत डॉ.ऋषिकेश संगिता सर्जेराव आंधळे यास, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ अंतर्गातील, वैद्यकीय अधिकारी गट-अ म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र लिंबागणेश, जिल्हा बीड येथे पदस्थापना मिळाली आहे लिंबागणेश आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नव्हते आता कायमस्वरूपी अधिकारी मिळाले असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. डॉ.ऋषिकेश आंधळे यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सरपंच रतन जायभाये, उपसरपंच शेषराव आंधळे, श्रीमंत जायभाये, दुध संघाचे चेअरमन लाला पाटील चौरे, पत्रकार सुभाष चौरे, गुंडीबा चौरे, गोविंद चौरे, सर्जेराव आंधळे सर यांनी अभिनंदन केले.

# भाजपा मंडल अध्यक्षांचा सत्कार संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ एप्रिल**



दि. २६ रविवार रोजी माजलगाव येथे डॉ. प्रशांत पाटील यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पार्टीच्या माजलगाव शहर मंडल अध्यक्षपदी विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडल अध्यक्षपदी सौ रुपालीताई कचरे, व पात्रुड मंडल अध्यक्षपदी डॉ. अभिजीत सोळंके यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील यांनी तिन्ही मंडळ अध्यक्ष यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व भारतीय जनता पार्टीचे काम तिन्ही मंडल अध्यक्ष तळागाळापर्यंत पोहोचवून भाजपा कार्यकर्त्यांचे कामे तुमच्या हातून होतील व त्याच बरोबर सर्वसामान्य नागरिकांची सेवा आपल्या हातून घडेल अशा सदिच्छा व्यक्त केल्या. श्री सिद्धेश्वर संकुलाचे कार्यवाह विश्वासजी जोशी, हरिभाऊ नवले, पवन मोगरेकर यांनी ही आपले विचार व्यक्त करून अभिनंदन पर शुभेच्छा दिल्या, या प्रसंगी उपस्थित प्रशांतजी भानप कैलास जोशी, रामभाऊ जाधव, अविनाशजी कांडुरे, मा. सरपंच प्रल्हाद दळवी डॉ.गणेश पाटील शरदराव कचरे रामेश्वर चव्हाण नामदेव मुळे सुभाष कांबळे अनिल गोंडे, गोपाळ कुलकर्णी शुभम वांझरखेडे, सौ.प्रिती पाटील व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक निरंजन वाघमारे यांनी केले तर आभार विनायक रत्नपारखी यांनी मानले.

# बनकरांजा येथील शेतात लागलेल्या आगीत एका गाईसह जीवनावश्यक वस्तू जळून भस्मसात

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२८ एप्रिल**



तालुक्यातील बनकरांजा शिवारातील असणाऱ्या शेतातील कोठ्यास अचानक लागलेल्या आगीत एका गाईसह जीवनावश्यक वस्तू जळून भस्मसात झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,अमोल दिनकर थोरात रा.बनकरांजा यांचे बनकरांजा शिवारातील शेतात अचानक लागलेल्या आगीत कोठ्यामध्ये असणारी जिवंत गाय( व्ह्याहला झालेली) तसेच स्प्रिंकलर सट,अंदाजे पाच एकर मधील ठिबक संच,बोर मधील अंदाजे एक हजार फुट केबल,गाय गोठा,कोट्यातील धान्य साठा व जीवनावश्यक वस्तू असा अंदाजे एकूण पाच ते सहा लाखाचे नुकसान रुपयाचे नुकसान शेतकऱ्याचे झाले आहे.

शेतात ये जा करणाऱ्या शेतकऱ्यांनी ही आग विझवून मोठा अनर्थ टाळला.मात्र व्ह्याहला झालेली जिवंत गाय आणि अंदाजे एक हजार फुट केबल,गाय गोठा,कोट्यातील धान्य साठा व जीवनावश्यक वस्तू जळाल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.त्यांना प्रशासनाकडून तात्काळ मदत मिळणे गरजेचे आहे.

## सं क्षि प्त

### जालना :बातमीचा राग- राग करून पोलिसांत खोटी तक्रार करणाऱ्या प्रियंका राजपूतची हकालपट्टी करा;

# पत्रकारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगर पालिकेमध्ये रुजु झाल्यापासून अनेक विषय आणि प्रकरणांमध्ये वादग्रस्त ठरलेल्या जालना शहर महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांच्या बाबत पत्रकार सय्यद अफसर यांनी बातमी प्रकाशित केली म्हणून पत्रकारांचा आवाज दाबण्यासाठी प्रियंका राजपूत यांनी त्यांच्या विरोधात कदीम जालना पोलिस ठाण्यात खोटी तक्रार दिलेली आहे.तसेच वादग्रस्त अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांच्यावर झालेल्या आरोपाची प्रतिक्रीया घेण्यासाठी पत्रकार सय्यद अफसर गेले असता त्यांना अपमानीत करुन धमकी दिली.त्यामुळे प्रियंका राजपूत यांची हकालपट्टी करा अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करू असा ईशारा आज पत्रकारांनी जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्तांना निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे.राजपूत यांनी पोलीस स्टेशनमध्ये खोटी तक्रार दिली असून ही तक्रार तत्काळ रद्द करण्यात यावी आणि वादग्रस्त



प्रियंका राजपूत यांची जालना महानगर पालिकेतून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी, नसता पत्रकार संघटनाकडून राज्यभरात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल.असा ईशारा पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,विभागीय आयुक्त दिलीप गावडे,पोलीस अधीक्षक,जालना महापालिकेचे आयुक्त यांनाही निवेदनाच्या प्रति पाठवण्यात आल्या आहेत.

दिलेल्या निवेदनावर विकासकुमार बागडी,सुयोग खर्डेकर,रविकांत दानम,शब्बीर पठाण, नाजिम मणियार, आमेर खान, शेख सलीम, सुनील भारती, सय्यद अफसर, देवचंद सावरे, सचिन सर्वे, शेख मुजीबुद्दीन, कादरी हुसेन, विजय साळी, अर्शद मिर्झा, आकाश माने, विकास काळे, श्रीकिशन झंवर, बाबासाहेब नरवडे, बासीत बेग, शेख इलियास अब्बास, भगवान निकम, गौतम वाघमारे, दिनेश नंद, शेख मुसा, सुनील खरात, लियाकत अली खान, शेख उमर, युवराज कुरील, गणेश जाधव, धनसिंह सुर्यवंशी,योगेश काकफळे, संजय आहेर इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शरदचंद्र पवार महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन: येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयात सोमवार २८ रोजी पदवी वितरण सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाची प्रथम बॅच २०२१- २२ या विद्यार्थ्यांचा शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. डॉ. अंकुश जाधव यांच्या उपस्थितीत व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. प्रा. शिवाजी वर्पे व प्रा. कृष्णा पाटील इंगळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आली. यावेळी गायके सुदर्शन, खरात विशाल, गाडे सोमीनाथ, इंगळे मोनिका, शेळके पूजा, साबळे पूजा, जाधव विशाल यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमास विजय सोनवणे, राजेंद्र जाधव, उत्तम इंगळे, उमेश गायकवाड, उमेश घोडके, स्वप्निल बनकर, यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# 'कालीका स्टील्स'ला 'सीएमआयए अवॉर्ड्स २०२५' मध्ये 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन' पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी** भारतातील एक अग्रगण्य स्टील उत्पादक कंपनी असलेल्या 'कालीका स्टील्स'ला 'सीएमआयए २०२५' पुरस्कारांमध्ये 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन' या श्रेणीत गौरवण्यात आले. हा पुरस्कार २७ एप्रिल २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

१५० हून अधिक अर्जदारांची सखोल तपासणी व मुलाखतीनंतर पाच तज्ज्ञांच्या स्वतंत्र परीक्षक समितीने कालीका स्टील्सची निवड केली. पुरस्कार स्विकारताना श्री. घनश्याम गोयल, श्री. अनुज बन्सल आणि श्री. यश गोयल उपस्थित होते.

दोन दशकांहून अधिक उत्पादन उत्कृष्टतेचा वारसा असलेल्या कालीका स्टील्सने पर्यावरण संरक्षणासाठी 'शून्य निःसारण' धोरण अवलंबले आहे. त्यांच्या पर्यावरणीय व सामाजिक बांधिलकीच्या कार्याला मिळालेल्या या सन्मानामुळे औद्योगिक क्षेत्रात विशेष आनंद व्यक्त होत आहे.

# गोरोबा काकांच्या अभंगात भक्ती व प्रेमाची अनुभूती : भास्करराव दानवे

## कुंभार समाज सामाजिक संस्थेतर्फे पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी :** वारकरी संप्रदायातील प्रसिद्ध संत , विठ्ठलाचे निष्ठावान भक्त गोरोबा कुंभार यांनी आपल्या अभंगातून विठ्ठलाचे प्रेम आणि भक्ती व्यक्त केली.भक्ती आणि वैराग्याने संतांच्या मंडळीत एक विशेष स्थान मिळवलेल्या गोरोबा काकांची पुण्यतिथी पुढील वर्षी अधिक जोमाने साजरी करावी, आयोजनात आपले पूर्ण सहकार्य राहील. अशी हमी भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांनी दिली. महाराष्ट्र कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने संत गोरोबा काका यांच्या ७०८ व्या पुण्यतिथी निमित्त प्रतीवर्षाप्रमाणे यंदा ही शनिवारी ( ता.२६) कुंभार समाज सामाजिक संस्थेचे मराठवाडा अध्यक्ष दिगंबरराव पेरे यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे, जालना मर्चंट्स को- ऑप. बँकेचे संचालक अंकुशराव राऊत,शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, दिगंबर पेरे,जिल्हाध्यक्ष तथा सरपंच बद्रीनारायण भसांडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी संत गोरोबा काकांची परमार्थिक पदवी ही उच्च दर्जाची होती.त्यांनी भक्तीचे वैभव मिळवले होते, असे सांगून पुण्यतिथीच्या उपक्रमांना आपले पूर्ण सहकार्य राहील असे पाचफुले यांनी सांगितले. या प्रसंगी संजय शहाणे, कृष्णा पांगारकर, काशिनाथ बेनिवाल , राम शहाणे, बालाजी घोडके, मनोज वर्मा या भजनी मंडळाने विठ्ठल नामाचा गजर, गोरोबा काकांचे अभंग, भजने म्हंटली, महाआरती, व शेवटी भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला.या वेळी युवा जिल्हाध्यक्ष कृष्णा संत्रे, अरुण पेरे,संजय गोडबोले,जगन गोधेकर, लोकेश पेरे,मनोज गोदेकर, शुभम जोरले,अशोक गोधेकर, नरेश पेरे,राहुल गोदेकर,मंगेश पेरे, सुखदेव बजाज ,राजू पलय्ये, गौरव गोदेकर, श्याम शहाणे , शंकर कंकाळ, संजय शहाणे, नंदकिशोर येन्नावार यांच्या सह भाविक आणि कुंभार समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तिसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी -** फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने व राजस्थान फेंटबॉल असोसिएशन यांच्या वतीने आयोजीत तिसर्या राष्ट्रीय फेंटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२४ –२५ सेंट लॉरेन्स पब्लीक स्कुल, जैतपुरा, जयपुर राजस्थान या ठिकाणी दि. १८ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान उत्साहात संपन्न झाल्या. सदर राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातुन सात राज्यांचे

## महाराष्ट्र संघाची विजयाची हॅट्रीक

जवळपास १५० ते २०० खेळाडु, पंच व तांत्रीक अधिकारी सहभागी झाले होते. स्पर्धेत सातत्यपुर्ण कामगीरी करत महाराष्ट्राचा संघ अजिंक्य राहीला, तर यजमान राजस्थानला दुसर्या स्थानावर समाधान मानावे लागले. पंजाब व उत्तरप्रदेश संघाना कामगीरीच्या आधारावर तिसरे स्थान विभागुन देण्यात आले तर उत्तराखंड संघ चौथ्या स्थानावर राहीला. स्पर्धेचे उद्घाटन सेंट लॉरेन्स पब्लीक स्कुलचे संचालक डॉ. दिग्वीजय सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थान फेंटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कुमार चौधरी हे होते. यावेळी मंचावर फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया चे महासचिव शेख चाँद पी.जे., निरीक्षक शेख अहेमद, राजस्थानचे सचिव राजेंद्र योगी, शाळेच्या मुख्याध्यापीका श्रीमती सिंग मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना डॉ. दिग्वीजय सिंग यांनी खेळाडुंना शुभेच्छा देवुन आंतरराष्ट्रीय स्पर्धा जयपुर येथे आयोजीत करण्याची ईच्छा व्यक्त करत फेंटबॉल खेळाच्या विकासासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचे जाहिर केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष खुशालसिंग राणा ठाकुर यांनी भ्रमणध्वनी वरून उपस्थित सर्व खेळाडु, पंच व तांत्रीक अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या. तसेच स्पर्धा शिस्तबद्धरीत्या संपन्न करून फेंटबॉल खेळाचे नाव उंचवावे असे निर्देश ही यावेळी दिले. स्पर्धेत पंच म्हणुन शेख समीर, साहेल खान, सुरेश त्रीभुवन, संतोष वाघ, आर्यन जाधव, गिता वड्डापेल्ली यांना काम पाहीले. स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे निरीक्षक शेख अहेमद यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी मंचावर फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे महासचिव शेख चाँद पी.जे., राजस्थान फेंटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कुमार चौधरी, सचिव राजेंद्र योगी, ॲड. जी. आर. निठारवाल, मुकेशजी निठारवाल, जगदीश चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व विजेत्या खेळाडुंना मेडल व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, तसेच पंच व तांत्रीक अधिकारी यांना स्मृतीचिन्ह व शिट्ट्या प्रदान करण्यात आल्या. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजस्थान फेंटबॉल असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व खेळाडुंनी अथक परीश्रम घेतले. स्पर्धेचा अंतीम निकाल पुढिल प्रमाणे :- टिम चॅम्पीयनशिप – चौदा वर्षाआतील मुले – प्रथम राजस्थान, द्वितीय महाराष्ट्र, सतरा वर्षाआतील मुली – प्रथम राजस्थान, द्वितीय महाराष्ट्र, विस वर्षाआतील मुले – प्रथम महाराष्ट्र, द्वितीय – राजस्थान, विस वर्षाआतील मुली – प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान, विस वर्षावरील पुरूष – प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान, तृतीय पंजाब, चतुर्थ उत्तरप्रदेश, विस वर्षावरील महीला – प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान.

वैयक्तीक – चौदा वर्षाआतील मुले – दुहेरी – प्रथम सोमनाथ चव्हाण, रूद्राक्ष एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय दक्ष सांखला, सावन जाट (राजस्थान), तिहेरी – प्रथम कार्तीक गाडेकर, आदर्श हरबक, रूद्राक्ष एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय नकुल सोनी, राहुल विर, आयुष जाट (राजस्थान), सतरा वर्षाआतील – मुली – दुहेरी – प्रथम – कोमल चव्हाण, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय दक्षीता सांखला, वर्षा कुमारी नवारीया (राजस्थान), तिहेरी – प्रथम किरण सुळे, साक्षी मुळे, आराध्या हरबक (महाराष्ट्र), द्वितीय नेहा कुमारी, मुस्कान जाट, दिव्या समारिया (राजस्थान), मिश्र दुहेरी – प्रथम – आदर्श हरबक, आराध्या हरबक (महाराष्ट्र), द्वितीय – वर्षा कुमारी, नवाधीश शर्मा (राजस्थान), मिश्र तिहेरी – प्रथम – सोमनाथ चव्हाण, कार्तीक गाडेकर, गौरी शेळके (महाराष्ट्र), द्वितीय – दक्षीता सांखला, जयेश योगी, शिवम योगी (राजस्थान), विस वर्षाआतील – मुली – दुहेरी – प्रथम – जैसीका बत्रा, ज्योती वर्मा (राजस्थान), द्वितीय – शुभांगी पाटेकर, गौरी शेळके (महाराष्ट्र), तिहेरी – प्रथम – सायली एखंडे, साक्षी चव्हाण, शुभांगी पाटेकर (महाराष्ट्र), द्वितीय – इशा सैनी, राघनी कुमारी, हर्षीता वर्मा (राजस्थान), मुले – दुहेरी – प्रथम – अक्षय पवार, अर्जुन शिंदे (महाराष्ट्र), द्वितीय – शिवम सिंग, नकुल सोनी (राजस्थान), तिहेरी – प्रथम – संकेत रोजेकर, शेख साबेर, शेख अहेरार (महाराष्ट्र), द्वितीय – मोहीत कुमार नवारीया, दक्ष सांखला, गगन जाट (राजस्थान), मिश्र – दुहेरी – शेख साबेर, सायली एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय – ज्योती वर्मा, नकुल सोनी (राजस्थान), मिश्र – तिहेरी – प्रथम – कोमल चव्हाण, किरण सुळे, संस्कार यादव (महाराष्ट्र), द्वितीय – ईशा सैनी, दिनेश यादव, हर्षीता वर्मा (राजस्थान), विस वर्षा वरील महिला – दुहेरी – प्रथम – सायली एखंडे, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय – पलक कुमारी, कल्पना पालीवाल (राजस्थान), तिहेरी – प्रथम – गिता वड्डापेल्ली, कोमल चव्हाण, गौरी शेळके (महाराष्ट्र), द्वितीय – संजु यादव, अर्चना चौधरी, चंदु घोसल्या (राजस्थान), पुरूष – दुहेरी – प्रथम – आर्यन जाधव, अंकीत यादव (महाराष्ट्र), द्वितीय – जयेश योगी, शिवम सिंग (राजस्थान), तिहेरी – प्रथम – संस्कार यादव, श्रावण राठोड, पवन पवार (महाराष्ट्र), द्वितीय – सिद्धार्थ योगी, दिनेश यादव, नवाधीश शर्मा (राजस्थान), मिश्र – दुहेरी – प्रथम – संकेत रोजेकर, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय – पलक कुमारी नवारीया, सिद्धार्थ योगी (राजस्थान), तिहेरी – प्रथम – गिता वड्डापेल्ली, साक्षी चव्हाण, आर्यन जाधव (महाराष्ट्र), द्वितीय – कल्पना पालीवाल, संजु यादव, भानु सोनी (राजस्थान),

### जालन्याच्या मातीतुन निघालेला खेळ तिन वर्षात पोहोचला पाच देशात

जालना शहरातील देवगिरी इंग्लिश स्कुलच्या मैदानावर सुरू झालेला फेंटबॉल हा खेळ खुशाल सिंग राणा ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या आर्थीक पाठबळामुळे बघता बघता भारतातील जवळपास १२ राज्ये व पाच देशात सध्या खेळता जात आहे. सलग तिन वर्षापासुन या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धा देशाच्या विवीध ठिकाणी आयोजीत करण्यात येत आहेत, यामध्ये पहिली राष्ट्रीय स्पर्धा औरंगाबाद (आजचे छ. संभाजी नगर), दुसरी राष्ट्रीय स्पर्धा बुर्हानपुर मध्य प्रदेश तर तिसरी स्पर्धा जयपुर राजस्थान या ठिकाणी संपन्न झाली आहे. लवकरच नेपाळ येथे आंतरराष्ट्रीय त्रीकोणीय मालीका भारत, बांग्लादेश व नेपाळ यांच्यात खेळवीली जाणार असुन २०२७ मध्ये आठ देशांची आंतरराष्ट्रीय स्पर्धा ही आयोजीत करण्यात येणार आहे. फेंटबॉल खेळाच्या प्रचार व प्रसारामध्ये देवगिरी इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष तसेच राष्ट्रीय संयोजन समीतीचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, मुख्याध्यापीका प्रा. गायत्री सोरटी, पुणे जिल्हाध्यक्ष विशाल पवार, सचिव श्रीमती रूपाली पवार, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे पा., राष्ट्रीय निरीक्षक शेख अहेमद, युवा नेते अक्षय पवार, सुरेश त्रीभुवन, विशाल साळवे, प्रविण जाधव, राजकुमार दांडगे, जे.ई.एस. कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, तायक्कांडो चे जिल्हा सचिव तथा पोलीस दलात कार्यरत असलेले सचिन आर्य, मुख्याध्यापीका श्रीमती सुनीता गवई, मुख्याध्यापक सुभाष पारे, मुख्याध्यापक गणेश लांडगे, क्रीडा शिक्षक उमेशचंद्र खंदारकर, तुषार गर्जे, मंगेश सोरटी, अमोल सातपुते, सुरेश सावंत, मो. मारूफ खान, अमोल सोलाट तसेच शेख समीर, सोहेल खान, संतोष वाघ, शेख सरताज, वेदांत सोरटी, आर्यन जाधव, नितीन जाधव, शेख मतीन, अमोल काटकर, शेख महेजबीन, गिता वड्डापेल्ली या सर्वांचा सिंहाचा वाटा आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची देशाला गरज - मा. रावसाहेब पाटील दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ११६ व्या जयंती महोत्सव निमित्ताने कार्यकर्ता मेळावा चिंतन शिबीर व सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन जाफ्राबाद ला हिंदुस्थान लॉन्स येथे अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ यांच्यावतिने आयोजित करण्यात आले होते यात्प्रसंगी ते बोलत होते.

या मेळाव्यात बोलतांना पुढे म्हणाले की जेव्हा इंग्रजांचा काळ होता अशावेळी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी देशात जागृती निर्माण करण्याचे कार्य केले,१९६२ च्या भारत चीन युद्धाच्या प्रसंगी भारतीय सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी देशाच्या सीमेवर जाऊन मार्गदर्शन केले,संपूर्ण जगाचा प्रवास करून जगाला मानवतावादी विचार सांगितला, आपल्या खंजिरी भजनाने समाजात जागृती केली ,ग्रामगीता हा ग्रंथ लिहून आदर्श गाव कसे असावे हे त्यांनी त्यांच्या तत्वज्ञान मधून सांगितले त्याचप्रमाणे स्वर्गीय डॉ. उध्दवदादा गाडेकर यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करून गाडेकर दादांची आठवण त्यांनी काढली दादांच्या कार्याचे अनेक प्रसंग त्यांनी सांगितले दादा व त्यांच्या जिव्हाळ्याचा संबंध होता व तेच कार्य शुकदास गाडेकर हे करत आहे त्यांच्या पाठिशी आपण समर्थपणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले.यात्प्रसंगी पंचायत राजचे अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे, प्रचारक तथा राष्ट्रीय कीर्तनकार शुकदास महाराज गाडेकर ,गुरुकुंज आश्रम जि अमरावती येथील श्री अमोल बांबल,श्री दिलीप कोहळे,मराठवाडा प्रांत सेवाधिकारी श्री मनीष जैस्वाल ,यांच्यासह जानेफळ आश्रम ची मंडळी व सर्वच स्थानिक पदाधिकारी



,इतर सर्वच पक्षाचे नेते पुढारी तालुक्यातील व संपूर्ण मराठवाड्यातील श्रीगुरुदेव सेवामंडळाचे कार्यकर्ते,संतमहंत मंडळी, महिलाभगिनी,तरुण बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी: जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा नागरिकांना सेवेचा हक्क देणारा महत्वाचा कायदा आहे. या कायद्यान्वये नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज येथे केले. येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यामधील लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, नागरीक जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी तसेच अधिकारी व अधिनस्त कार्यालये आदी यावेळी उपस्थित होते. तसेच यावेळी सेवेच्या बांधिलकी मानणारी शपथ घेण्यात आली. यावेळी डॉ. पांचाळ मार्गदर्शन करतांना म्हणाले की, सेवा हक्क कायदा संपूर्ण राज्यात सर्व शासकीय सेवा देणाऱ्या विभागांसाठी लागू करण्यात आला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना



विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्याचा अधिकारी प्राप्त झालेला आहे. त्यामुळे शासकीय विभागाच्या अधिसूचीत सेवा विहित कालमर्यादेत नागरिकांना पुरविणे बंधनकारक आहे. शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ नागरिकांना सुलभरित्या व तत्परतेने घेता यावा, यासाठी आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या अधिकतम सेवा अधिसूचित करण्यासोबतच कायद्याच्या जनजागृतीसाठी विभागप्रमुखांनी प्रयत्न करणे आवश्क आहे. तसेच कायद्याची योग्य अंमलबजावणी देखील करणे आवश्यक आहे. या कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली असल्याचे देखील डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले. यावेळी कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध विभाग प्रमुख यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

नागरीकांना जलद गतीने सेवा देणाऱ्या नायब तहसीलदार मंगेश साबळे,तहसील कार्यालय जाफ्राबादाचे नायब तहसीलदार राजु निहाळ, तहसिल कार्यालय जालन्याचे नायब तहसीलदार कृष्णा फुलमाळी, अनुराधा नागोरी यांचा तसेच खुली निबंध स्पर्धेतील प्रथम,द्वि तीय व तृतीय पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र अविनाश जगताप व आसेफ पठाण , ओंकार घाटुळे यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# जिल्हा परिषद माळकिणी शाळेचा सोहम जाधव शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा २५ एप्रिल रोजी जाहीर झाला. यामध्ये मंठा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळकिणी या शाळेतील सोहम सुनील जाधव हा विद्यार्थी पात्र ठरला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाने माळकिणी शाळेची आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. मुख्याध्यापक भगवान जायभाये,गजानन निर्वळ, ज्ञानेश्वर राठोड या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे.या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी विपुल भागवत,शिक्षण विस्ताराधिकारी काशिनाथ राठोड, केंद्रप्रमुख शिवाजी देशमुख तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थी सोहम सुनील जाधव यांचे अभिनंदन केले.

# " त्या" कामाला आपल्याच कार्यकाळात मंजुरी : फुकटचे श्रेय लाटू नका

## माजी आमदार कैलास गोरंटयाल यांचा प्रतिस्पर्ध्यांना टोला

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनीधी** अंबड येथील ३५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाला आपल्या कार्यकाळात सुमारे ७२ कोटींच्या निधिसह राज्य शासनाची मंजुरी मिळाली असून त्याच वेळी कामाला देखील सुरुवात करण्यात आली होती. त्यामुळे विद्यमान आमदारांनी आयत्या पिठावर रेघोट्या ओढून फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये असा टोला जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी लगावला आहे. जालना शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी राज्यात कॉंग्रेस आघाडीची सत्ता असतांना आपण जायकवाडी - जालना पाणी पुरवठा योजनेचा



प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला होता आणि सदर प्रस्तावास मंजुरी मिळवून घेतली होती याची आठवण करून देत गोरंटयाल म्हणाले की, या प्रस्तावित योजनेच्या कामात देखील अनेक अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या विरोधकांनी केला होता.मात्र, या सर्व अडथळ्यांवर मात करून आपण योजनेचे काम तडीस लावले आणि या योजनेद्वरे जालना शहरातील जनतेला पाणी पुरवठा करण्याचा आपला संकल्प पूर्ण केला. या योजनेचे अंदाजपत्रक तयार करतांना प्रशासकीय पातळीवरून अंबड

**दररोज पाणी पुरवठा हे आपले स्वप्न होते**

**राज्यात मुंबई, पुणे, नागपूर या शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा होतो. त्याच धर्तीवर जालना शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याचे आपले स्वप्न होते. तसे आश्वासन आपण विधानसभा निवडणुकीत प्रचारा दरम्यान शहरातील जनतेला देखील दिले होते.अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील आपल्या कार्यकाळात सुरू झालेले काम पूर्ण होताच शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याचे आपले स्वप्न साकार होईल असा विश्वास माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.**

येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध करण्याची क्षमता चुकून १५ एमएलडी इतकी ठेवण्यात आली. त्यामुळे या ठिकाणी आणखी ३५ एमएलडी इतकी क्षमता असलेले जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी मंजुरी मिळावी तसेच राष्ट्रसंत गाडगे बाबा जलाशय (घानेवाडी) ते जेईएस महाविद्यालयाच्या पाठीमागे असलेल्या जुन्या एमआयडीसी भागातील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत या जीर्ण झालेल्या जलवाहिनीचे नव्याने काम करण्यासाठी आपण राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार करून त्या बाबत विधिमंडळाच्या अधिवेशनात देखील वारंवार पाठपुरावा केला होता.त्यामुळेच आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात उपरोक्त दोन्हीही कामांना मंजुरी देत राज्य सरकारने त्यासाठी सुमारे ७२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केल्याचे सांगून त्यानंतर या कामाला आपल्याच कार्यकाळात सुरुवात झाली होती असे असतांनाही विद्यमान आमदार आपण मंजूर करून आणलेल्या व आपल्याच कार्यकाळात सुरू झालेल्या विकास कामांचे फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.आपण मंजूर करून आणलेल्या विकास कामांचे श्रेय लाटण्याऐवजी राज्यात सत्तेत असलेल्या या महाशयांनी शहराच्या विकासात भर पडेल असे काही तरी भरीव काम करून दाखवावे असे आव्हान गोरंटयाल यांनी दिले आहे.

# आ.खोतकर पिता- पूत्रांना धमकी देणाऱ्यांविरूध्द तात्काळ कठोर कारवाई करावी!

**तभा वृत्तसेवा जालना । प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा अंदाज समितीचे प्रमुख आ.अर्जुनराव खोतकर आणि युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांना समाज माध्यमांद्वरे धमकी देणाऱ्यां विरुद्ध तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जालना शहर व जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हा पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे. आ. अर्जुनराव खोतकर आणि अभिमन्यू खोतकर यांना समाज माध्यमांतून मिळालेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी ( ता. २६) शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, जिल्हा संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, ॲड. सुनील किनगांवकर,फेरोज लाला तांबोळी, जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कालिंदा ढगे, दलित आघाडी जिल्हा प्रमुख ॲड. भास्कर मगरे, युवा सेना जिल्हाप्रमुख अमित ठाकूर, शैलेश घुमारे,अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख जावेद यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नेपानी यांची भेट घेऊन निवेदन दिले.आ. अर्जुनराव खोतकर व अभिमन्यू खोतकर यांना मिळालेल्या धमकी मुळे कुटुंबिय, पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक व्यथित झाले आहेत. हा प्रकार म्हणजे लोकशाही व्यवस्थेवर आघात असून अनुभवी, लोकप्रिय, मोठ्या पदावर असलेल्या लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या कुटूंबियांबाबत असे प्रकार या पुढे घडू नये यासाठी धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन गुन्हा दाखल करावा, या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, आ. अर्जुनराव खोतकर व अभिमन्यू खोतकर यांना आवश्यक पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे,

## अग्रलेख...

# पाकिस्तानची दुखरी नस

काश्मीरसाठी हिंसाचार, कटकारस्थान, विद्रोह नवीन नाही. कधीकाळी हिंदू सम्राट आणि राजांच्या काळात धरतीवरील स्वर्ग असलेल्या काश्मीरला यवनांचे पाय लागले अन् पाठोपाठ अवकळाही आली. तेव्हापासून भारताच्या शिरावरील हा मुकुट रक्ताने माखतो आहे. बैसरणच्या हिरव्या कुरणावर सुटी साजरी करण्यासाठी आलेल्या निष्पाप पर्यटकांवर हल्ला करून आणि फक्त हिंदूंचे जीव घेऊन दहशतवाद्यांनी क्रूरतेच्या सर्व सीमा पार केल्या. पत्नी, मुलं आणि आईवडिलांसमोर हिंदू व्यक्तीला उभे करून त्यांच्यावर बेछूट गोळ्या घातल्या तेव्हा तेथील परिस्थिती काय असेल याची कल्पना केली तरी अंगावर शहारे उभे राहतात. ५ ऑगस्ट २०१९ रोजी ३७० कलम हटविल्यानंतर गेल्या चार वर्षांत मोदी सरकारने विकासाची कामे, रोजगार आणि पर्यटनाच्या बळावर उभ्या केलेल्या काश्मीरसाठी हा मोठा धक्काच. गेल्या ७५ वर्षांपासून रक्तरंजित संघर्षाचा सामना करीत असलेले कश्यप ऋषींचे हे काश्मीर स्वर्गासमान भासत असतानाच पुन्हा एकदा पाकसमर्थित दहशतवाद्यांनी डाव साधला आणि निष्पाप नागरिकांचे जीव घेतले. हा हल्ला केवळ पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या मानबिंदूवर केलेला प्रहार होय. भले तुम्ही १४० कोटी लोकसंख्या असलेला देश असाल, आम्ही तुम्हाला मोजत नाही, हे पुन्हा एकदा दहशतवाद्यांनी दाखवून दिले आहे. वारंवार हल्ले करून जखमी करण्याचे कारण एकच आणि ते म्हणजे हिंदूंमध्ये असलेली सहिष्णुता. म्हणूनच तर आता शांतता नांदेल, सर्व काही ठीक होईल, रक्तपात योग्य नाही, अशा भ्रमात आपण राहिलो आणि तिकडे दहशतवाद्यांनी डाव साधला. खरे तर १९४७-४८ मध्येच काश्मीरचा प्रश्न निकाली काढण्याची संधी चालून आली होती. पण, तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भूमिका आड आली. भारतीय सैन्य व्याप्त काश्मीरची राजधानी मुजफ्फराबादपासून अवघ्या ७० किलोमीटर अंतरावर होते. उरी जिंकून डोमेलच्या दिशेने भारतीय लष्कराने कूच केले होते. अवघे काही तास जरी मिळाले असते तर मुजफ्फराबादमध्ये तिरंगा फडकला असता. पण, युद्धबंदी स्वीकारण्याचा जवाहरलाल नेहरू यांचा अवसानघातकी निर्णय आड आला. १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळीही काश्मीरचा मुद्दा निकाली काढण्याच्या संधी आल्या होत्या, पण तत्कालीन राजकीय नेतृत्वामुळे त्याही गमावल्या. वारंवार जखमा आणि धोके मिळूनही आपण त्यापासून धडा घेतला नाही. १९९९ मध्ये तर विश्वासघातकीपणाचा पाकिस्तानने कळस केला. एकीकडे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी शांतता बस घेऊन लाहोरला गेले असता दुसरीकडे पाकिस्तानी लष्कर कारगिलच्या टेकड्यांवर मोर्चेबंदी करण्यात गुंतले होते. यावेळीही भारताला मर्यादित युद्ध करावे लागले. नियंत्रण रेषा पार न करण्याच्या सूचना लष्कराला देण्यात आल्या होत्या. पाकिस्तानला नियंत्रण रेषेचे पावित्र्य राखण्याचे देणेघेणे नसल्यास भारताने तरी ते का करावे? एकतर्फी शांततेला काडीचेही महत्त्व नसते. दुर्दैवाने भारत सातत्याने शांततेचे तुणतुणे वाजवत आला आहे. त्याचे परिणाम आपण भोगत आहोत.

वर्तमान काळात कुठल्याही देशाला थेट युद्धात उतरणे परवडणारे नसले तरी युद्ध न करता शत्रू राष्ट्राच्या मुसक्या आवळणे शक्य आहे. पुलवामा, उरी घटनेनंतर भारतीय जवानांनी बालाकोटवर झडप घातली आणि आमच्या वाटेला जाल तर तुमची नखे उपटून फेकू, असा इशाराच मोदी सरकारने दिला. नेतृत्व कणखर असेल, आघाडीवर राहणारे असेल तर सैन्यालाही हुरूप येत असतो. पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला करून पाकिस्तानधार्जिण्या दहशतवाद्यांनी फार मोठी चूक केली आहे. याचे परिणार फार भयंकर होतील, याची धास्ती पाकिस्तानला बसली आहे. त्याचे परिणामही दिसू लागले असून आम्ही पहलगाम घटनेच्या निष्पक्ष चौकशीला सहकार्य करण्यास तयार आहोत, असे वक्तव्य पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केले आहे. या वक्तव्याला भारताने अद्याप अधिकृतपणे उत्तर दिले नाही. हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या नसा आवळणे सुरू केल्यानेच शाहबाज 'शरीफ' होण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकीकडे पाकिस्तान भारताला प्रत्युत्तर देण्यास तयार असल्याचा आव आणत असला तरी पाकिस्तानी लष्कर आणि राजकीय यंत्रणा आतून पुरती हादरली आहे. खरे तर भारताने केलेल्या जलकोंडीमुळे पाकिस्तानी नेते चिथावणीखोर विधाने करीत सुटले आहेत. ही परिस्थिती कुणामुळे निर्माण झाली याचा विचार प्रथम करणे आवश्यक आहे. सिंधू पाणी वाटप करार स्थगित करून मोदी सरकारने पाकिस्तानविरोधात एकही गोळी न झाडता युद्ध जिंकले असे म्हणावे लागेल. वाजपेयी सरकारच्या काळात तत्कालीन लष्करशहा परवेज मुशर्रफ भारतभेटीवर आले असता पत्रकारांशी वार्तालाप करताना, झालेच तर पुढील युद्ध पाण्यासाठी होईल, असे वक्तव्य केले होते. सिंधू नदी ही पाकिस्तानची जीवनदायिनी आहे. भारतातून वाहत जाणारी ही नदी अरबी समुद्राला मिळते. या नदीच्या पाण्यावर पाकिस्तानची ९० टक्के शेती अवलंबून आहे. मोठमोठी धरणे या नदीवर बांधली आहेत. जलविद्युत प्रकल्प आहेत. मोठमोठ्या उद्योगांना याच नदीतील पाण्याचा पुरवठा होतो. आता सिंधू पाणी वाटप करार स्थगित केल्याने भविष्यात आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना पाकिस्तानला आली असेल. युद्ध झालेच तर ते कधीतरी संपेल पण पाणीच नसेल तर काय? पाकिस्तानसाठी उन्हाळा फार भयंकर असतो. त्यात बर्फ वितळून तयार होणारे शुद्ध पाणी जर मिळाले नाही तर आपली काय अवस्था होईल, याची भीती पाकिस्तानला वाटत आहे. आधीच बलुचिस्तानात स्वातंत्र्यलढा सुरू असताना फौजेला नियंत्रण रेषेवर उतरविणे धोक्याचे असल्याची जाणीव शरीफ सरकारला झाली आहे. ज्या तालिबानला पाकिस्तान लष्कराने पोसले, पोक्त केले तेच तालिबानी आज पाकिस्तानी सैनिकांवर हल्ले करीत आहेत. पण, 'गिरे तो भी टांग उपर' या म्हणीप्रमाणे आपण घाबरलेलो नाही हे दाखविण्यासाठी पाकिस्तानी रेंजर्स गेल्या तीन रात्रींपासून नियंत्रण रेषेवर गोळीबार करीत आहेत. हे धारिष्ट्य केवळ जनतेचे मनोबल टिकून राहावे यासाठी असले तरी सध्या भारताशी थेट दोन हात करणे म्हणजे मरण ओढवून घेणे आहे, याची जाणीव त्यांनाही आहेच.

भारतात जसे काही बोलघेवडे आहेत तसेच पाकिस्तानातही आहेतच. पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान दिवंगत बेनझीर भुट्टो यांचे पुत्र बिलावल यांनी शुक्रवारी सिंधू नदीच्या किनारी सक्कर येथील सभेत बोलताना सिंधू नदीतून एक तर पाणी वाहील किंवा भारतीयांचे रक्त, अशी धमकी दिली. सिंधू करारात केवळ सिंधूच नव्हे तर झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि बियास या नद्यांचाही उल्लेख आहे, हे बिलावल विसरले असतील. वास्तविक दोन्ही देशांत जो नवा संघर्ष उभा ठाकला आहे तो पाकिस्तानसमर्थित दहशतवाद्यांमुळेच. एवढेच नव्हे तर बिलावलची जन्मदात्री बेनझीर यांनाही प्रचारसभेत असताना दहशतवाद्यांनीच बॉम्बस्फोट घडवून ठार मारले होते. तशीही भुट्टो कुटुंबीयांनी भारताबरोबर शत्रुत्वाची भावना मनात जपून ठेवली आहे. बेनझीर भुट्टो जेव्हा पहिल्यांदा पंतप्रधान झाल्या होत्या तेव्हा गरज पडल्यास काश्मीरसाठी भारताबरोबर एक हजार वर्षे युद्ध करू, असे दर्पोक्तियुक्त विधान केले होते. बिलावलही मातेच्याच पावलावर पाऊल ठेवत आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पाच दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील भेद स्पष्ट करणारे अनावश्यक आणि मध्ययुगीन काळातील मानसिकता दर्शविणारे विधान इस्लामाबाद येथे केले. द्विराष्ट्र सिद्धांत हा किती आवश्यक आहे हे सांगतानाच काश्मीर ही पाकिस्तानची जग्युलर व्हेन असल्याचे म्हटले. ही नसच मेंदू आणि हृदयाला रक्तपुरवठा करते. अर्थात काश्मीरशिवाय पाकिस्तान अपूर्ण असल्याचा त्याचा अर्थ निघतो. पण, मुनीर यांना हे काय माहीत की नरेंद्र मोदी ही दुखरी नसच वेगळ्या पद्धतीने दाबतील?

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# पहलगामचा मास्टरमाईंड!

मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणा याला भारतात आणून आठ दिवसही झाले नसताना, झेलम पुन्हा एकदा लाल झाली. पहलगाममध्ये करण्यात आलेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ भारतीय पर्यटक ठार झाले. हे सारे हिंदू होते. या हल्ल्याचा मास्टरमाईंड कोण? पाकिस्तानचे लष्करप्रमुख-जनरल असीम मुनीर? पाकिस्तान सरकार? एखादी दहशतवादी संघटना? नाही! जनरल मुनीर हे तर या खेळातील फक्त एक प्यादे आहेत. काश्मीरमधील घटनाक्रमाचा खरा मास्टरमाईंड आहे- चीन!

**जनरल मुनीर यांचे गरळ :** कुराण शरीफ कंठस्थ असणारे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या एका ताज्या भाषणानंतर पहलगाम हत्याकांड घडले. जनरल मुनीर यांनी आपल्या भाषणात काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. विशेष म्हणजे त्यांचे भाषण सुरू असताना पंतप्रधान शाहबाज शरीफ उपस्थित होते. 'काश्मीरमधील बांधवांचा पाकिस्तानात येण्यासाठी संघर्ष सुरू आहे. आमचा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. काश्मीरला पाकिस्तानपासून कुणीही वेगळे करू शकत नाही' असे प्रतिपादन जनरल मुनीर यांनी केले.

जनरल असीम मुनीर यांचे हे भाषण बहुधा अनिवासी पाकिस्तानींसमोर झाले असावे असे दिसते. जगात फक्त दोनच देश कुराणामधील आयतांच्या आधारांवर स्थापन झाले असून, त्यातील पाकिस्तान एक आहे. पाकिस्तानच्या निर्मितीची कथा संस्मरणीय अशी आहे, या कथेचा विसर कुणालाही पडता कामा नये असे प्रतिपादन करताना जनरल मुनीर यांनी पाकिस्तानी नागरिकांना नव्या पिढीस पाकिस्तान निर्मितीची कथा सांगण्याचा आग्रह केला. पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या आधारवर झाली असून, हिंदूंपासून आपण कसे वेगळे आहोत हे उपस्थितांना समजावून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनरल मुनीर यांना कुराण कंठस्थ असल्याने कुराणमधील काही आयता म्हणून दाखवीत त्यांनी आपली भूमिका मांडली.

**पाकिस्तान प्रगतिपथावर? :** पाकिस्तान प्रगतिपथावर आहे. पाकिस्तान जगात सर्वोच्च स्थान प्राप्त करणार आहे. त्या मार्गावर पाकिस्तानचे मार्गक्रमण सुरू झाले आहे. त्यात आता माघार नाही, असे म्हणत जनरल मुनीर यांनी टाळ्या मिळविल्या. पाकिस्तानचे लष्कर अतिशय मजबूत आहे. बलुचिस्तान आर्मी वा आणखी काही फुटीर गटांना आम्ही चिरडून टाकू असेही त्यांनी टाळ्यांच्या गजरात सांगून टाकले. जनरल मुनीर यांनी आपल्या भाषणात अनेक वेळा टाळ्या तर मिळविल्या पण, पाकिस्तानच्या रिकाम्या खजिन्याचे काय, या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याजवळ स्वाभाविकच नसावे.

**भारताचा आक्षेप :** जनरल मुनीर यांच्या भाषणावर भारताने जोरदार आक्षेप घेत, त्यांच्या भूमिकेचा प्रतिवाद केला. जनरल मुनीर यांची भूमिका दोन्ही देशांच्या संबंधांसाठी सलोखा निर्माण करणारी नाही असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले.

**चीनचे पाठबळ? :** पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी अचानक काश्मीरचा मुद्दा उपस्थित करणे आणि बांगलादेशने उघडउघड भारतविरोधी भूमिका घेणे याला चीनचे पाठबळ असल्याचे मानले जात आहे. पाकिस्तान सरकारने मागील काही महिन्यांपासून काश्मीरचा मुद्दा थंड्याबस्त्यात टाकल्यासारखे दिसत होते. मात्र, राष्ट्रपती वा पंतप्रधान यांनी यावर बोलण्याऐवजी लष्करप्रमुखांनी त्यावर भाष्य करणे याकडे वेगळ्या भूमिकेतून पाहिले जात आहे. जनरल मुनीर यांच्या या विधानाचा अर्थ म्हणजे येणाऱ्या काळात, पाकिस्तान काश्मीरमधील वातावरण पुन्हा गढूळ करण्याचा प्रयत्न करील असा काढला जात आहे.

**नवी व्यूहरचना :** जनरल मुनीर यांच्या भाषणाचे साद-पडसाद विरण्यापूर्वीच पहलगामचा नरसंहार घडला. पाकिस्तानची ही नवी व्यूहरचना असल्याचे दिसते. मागील काही वर्षांत पाकिस्तानने नागरिकांवर हल्ले न करता भारतीय सुरक्षा दळांवर हल्ले करण्याची व्यूहरचना राबविणे सुरू केले होते. आपल्या कारवाया काश्मीर खोऱ्यात करण्याऐवजी जम्मू भागात सुरू केल्या होत्या. डोडा- पूंछ-राजौरी या भागांत भारतीय लष्करावर हल्ले केले जात होते. आता त्यात बदल करून काश्मीर खोऱ्याची निवड करण्यात आली व नागरिकांचे शिरकाण करण्यात आले.

**बांगलादेशचे फुत्कार :** दुसरीकडे बांगलादेशनेही भारताविरोधात फुत्कार काढणे सुरू केले आहे. कालपर्यंत भारताला दबून राहणारा बांगलादेश भारताच्या अंतर्गत मामल्यांवर भाष्य करू लागला आहे. बांगलादेशने पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे झालेल्या हिंसाचाराबाबत भाष्य केले असून या हिंसाचाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. भारतानेही बांगलादेशला सुनावले असून, बांगलादेशने प्रथम आपल्या अंतर्गत परिस्थितीकडे पाहावे असे म्हणत भारताने बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांना अचानक भारताविरोधात बोलण्याचे बळ कसे व कुठून मिळाले?

**चीनची दुहेरी चाल :** चीन एकीकडे भारताशी संबंध सामान्य- सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि दुसरीकडे त्याने भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी पाकिस्तान व बांगलादेश या आपल्या मांडलिक देशांचा वापर सुरू केला आहे असे मानले जाते. चीनच्या चिथावणीशिवाय पाकिस्तान-बांगलादेश यांना अचानक भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे स्वप्न पडू शकत नाही हे भारताच्याही लक्षात आले असावे. पाकिस्तान तर भारताच्या विरोधात होताच. पाकिस्तानच्या भूमिकेत नवे काही नाही. मात्र, बांगलादेशची भारताच्या विरोधातील आक्रमक भूमिका भारतासाठी चिंतेची बाब ठरणार आहे.

**राष्ट्रपती ट्रम्पही दोषी :** पहलगाममध्ये झालेल्या नरसंहारात अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प हेही दोषी आहेत. आजवर अमेरिका जगातील सर्वांत मोठी महाशक्ती होती. याने रशिया व आता चीन दोन्ही महाशक्ती अमेरिकेला वचकून असत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी १०० दिवसांत अमेरिकेचा हा दरारा-दबदबा संपविला. त्यांनी नाटोला संपविले. याचे दोन परिणाम झाले. रशियाला युक्रेनमध्ये हैदोस करण्याची मोकळीक मिळाली. युक्रेन आता आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहे. अमेरिकेचे माजी परराष्ट्र मंत्री अंटोनी ब्लिंकन यांनी सध्याच्या स्थितीचे फार नेमके विवेचन केले आहे. एका मुलाखतीत ते म्हणतात, अमेरिका फर्स्ट हे ट्रम्प प्रशासनाचे धोरण आहे. पण, आता आम्ही 'अमेरिका फर्स्ट' ऐवजी 'अमेरिका अलोन' म्हणजे अमेरिका एकाकी या स्थितीत आलो आहोत.

**चीनला बळ :** अमेरिका एकाकी झाल्याचा परिणाम म्हणजे चीन शिरजोर होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर तत्कालीन सोवियत युनियन व अमेरिका दोघांनीही आपल्या मित्र राष्ट्रांचे गट तयार केले. आता रशियाची जागा चीनने घेतली आहे. चीन आपले हातपाय पसरण्याचा एक प्रयत्न करीत असताना, अमेरिकेने आपल्या मित्र राष्ट्रांना झिडकारले. याने चीन सुखावला. रशियाच्या डोळ्यात ज्याप्रमाणे युक्रेन सलत होते, चीनच्या डोळ्यात भारत सलत आहे.

**जागतिक महासत्ता होण्यासाठी :** जागतिक महासत्ता होणे हे चीनचे स्वप्न आहे. जागतिक महासत्ता होण्यासाठी आशियाची महासत्ता होणे आवश्यक आहे आणि आशियाची महासत्ता होण्यासाठी भारतावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. यासाठी चीनने आपला मोर्चा भारताकडे वळविला. पाच वर्षांपूर्वी त्याने लडाखमध्ये सरळसरळ लष्करी हस्तक्षेप केला होता. नंतर त्याने बांगलादेशमधील भारत समर्थक मानले जाणारे शेख हसीना सरकार उलथविले. आता त्याने पाकिस्तानला हाताशी धरून काश्मीर पुन्हा तापविले. चीन, पाकिस्तान व बांगलादेश असे तिहेरी आव्हान आता भारताला हाताळावे लागणार आहे.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# खिसा आपला, नफा बँकेचा...

भारतातील सरकारी बँकांमध्ये ११ बँका आहेत. विशेष म्हणजे या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया नाही. ती १२ वी सरकारी बँक असून, सर्वांत मोठी आहे. इतर सर्व ११ बँकांच्या बरोबरीची कदाचित स्टेट बँक एकटीच असावी. या बाराही बँकांचे दंडवसुलीचे सारखेच नियम आहेत. काही वर्षांपासून 'मिनिमम बॅलन्स', 'आवश्यक किमान शिल्लक रक्कम' नसल्यास या बँका आपल्या ग्राहकाला, खातेदाराला दंड ठोकण्याचा नियमच केला आहे. असा नियम करण्याची बँकांना गरज का भासली, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर कधीच मिळाले नाही किंवा कोणा बँक कर्मचाऱ्याला सांगता आले नाही. मुळातच या सर्वच बँका चांगला नफा कमावत असल्याचेच दिसून आले आहे. मध्यंतरी यापैकी काही बँका अडचणीत आल्या होत्या. बँक हा एक व्यवसाय आहे. या व्यवसायाच्या काही गरजा आहेत. त्यांना ग्राहक सेवा द्यावी लागते, व्यवस्थापन खर्च करावा लागतो, ते नियमित उत्पन्नात भागत नसल्यामुळे हा शिल्लक किमान रकमेचा नियम आल्याचे सांगतात. तर दुसरीकडे, बँकांचा नफा थोडाफार कमी झाला तर बिघडते कुठे, असाही प्रश्न सामान्य ग्राहक विचारतो. आणखी एक महत्त्वाचा दंड बँका आकारत असतात, तो म्हणजे जास्तीचा एटीएम वापर. एटीएम या अतिशय सोयीस्कर अशा सुविधेचा वापर अनेकदा खातेदारच बेलगाम पद्धतीने करतो. ही सुविधा देण्यास बँकांना मोठा खर्च करावाच लागतो. ही एटीएम सुविधा किती, कशी, कुठे वापरल्यास किती पैसे लागतात हे बँकांनी आधीच सांगितले असते. त्यामुळे त्याचा वापर खातेदाराने त्या हिशेबाने करणे आणि त्यानुसार पैसे मोजण्याची तयारी अपेक्षित आहेच.

'किमान शिल्लक'च्या नियमातून स्टेट बँक सोडून या ११ बँकांनी २०२० ते २०२४ दरम्यान आपल्याच खातेदारांकडून तब्बल ८५०० कोटी रुपयांची दंडवसुली केली आहे. २०२३-२४ या एकाच वर्षातील वसुली २३२६ कोटी रुपये इतकी आहे. यात बडोदा बँक ३८६, बँक ऑफ इंडिया १९४, महाराष्ट्र बँक १२६, कॅनरा बँक २८४, सेंट्रल बँक १२८, इंडियन बँक ३६९, इंडियन ओव्हरसीज बँक ४, पंजाब ॲण्ड सिंध बँक ३९, पंजाब नॅशनल बँक ६३३, युको बँक ३६ आणि युनियन बँक १२६ कोटी असा वाटा आहे. एकट्या स्टेट बँकेने २०१९-२० या आर्थिक वर्षात अशा दंडापोटी ६३३ कोटी रुपये वसूल केले आणि पुढे हा दंड घेणे २०२० पासून थांबवले. स्टेट बँकेने हा स्वागतार्ह निर्णय घेतला. पण इतर बँका तो का घेत नाहीत, हा प्रश्न सर्वसामान्य खातेदारांना सतावत असतो. या बँका तोट्यात नसतानाही केवळ नफा वाढविण्यासाठी ही दंड तरतूद गोंजारत असतात. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत या सर्व बँकांनी किमान शिल्लक आणि एटीएमचा अतिवापर या दोनच दंडांपोटी तब्बल ३५ हजार कोटी रुपये वसूल केले आहेत. ही आकडेवारी सरकारी ११-१२ बँकांचीच आहे. याशिवाय एचडीएफ, आयडीबीआय, अशा मोठ्या बँकांचे नियमही तसेच मोठे आणि महागडे आहेत. सध्या तर जगातील एक मोठी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एचडीएफसी बँकेत तर म्हणे १० हजार रुपये शिल्लक ठेवावे लागतात. ती कमी झाली की दंडही आपोआपच संगणकीय पद्धतीने ठोकला जातो.

एटीएमचा अतिवापर एकवेळ समजू शकतो, पण किमान शिलकीवर दंड हा तर अयोग्य, अन्याय्य आणि बेकायदेशीरच आहे. या बँका विविध प्रकारच्या ७० ते ८० सेवांच्या नावावर पैसे वसूल करतात. त्यावर जीएसटीसारखा १८ टक्के करही खातेदारच देतो. यापैकी अनेक सेवा यापूर्वी विनाशुल्क होत्या. मग आताच ही वसुली कशासाठी, या प्रश्नाला कोणी विचारत नाही, की विचारल्यास कोणी उत्तर देत नाही. या सर्व सरकारी बँकांनी २०२३-२४ या वर्षात सुमारे १.५० लाख कोटींचा नफा कमावला आहे. १५ हजारांपेक्षा जास्त शाखा आणि २.५ लाखांवर कर्मचारी असलेल्या एकट्या स्टेट बँकेचा २०२३-२४ चा नफा ६७,०८५ कोटी रुपयांचा आहे. याशिवाय या साऱ्याच बँकांमध्ये असलेल्या कोणीच मायबाप दावा करत नसलेल्या रकमांचा तर हिशेबच नाही. असे असतानाही नकळतपणे, कधी कधी काहीही संबंध नसताना 'सायबर भामटे' सर्वसामान्यांच्या खात्यातून पैसे उडवतात तेव्हा या बँका काय करतात? काही नशीबवान आणि हुशार खातेदार सोडले तर अशा लुबाडल्या गेलेल्या खातेदारांकडे त्या दुर्लक्षच करतात. त्यांच्या तक्रारींची दखलच घेत नाहीत. कधी काही महिन्यांनी, पाठपुरावा केल्यास 'प्रतिसाद' देऊन तुमची तक्रार किंवा 'डिस्प्युट' आम्ही अमुक कारणासाठी नाकारल्याचे 'स्टिरिओटाईप' छापील उत्तर देऊन मोकळे होतात. उलटपक्षी, स्टेट बँकेने तर १ लाखापर्यंतची 'उडवली' गेलेली रक्कम त्या खातेदाराला प्राथमिक खातरजमा करून कोणत्याही 'डिस्प्युट'विनाच परत देऊन टाकायला हवी. कारण या स्टेट बँकेचा सर्वसाधारण वार्षिक नफा आहे, ५० हजार कोटींपेक्षा जास्त..! मग आहे की नाही बरोबर..?

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# दहशतवादाचे समूळ उच्चाटन आवश्यक

नुकताच काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर जिहादी इस्लामी आतंकवाद्यांनी गोळीबार केला व त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. हा दहशतवाद पाकिस्तान पुरस्कृत आहे. पाकिस्तानच्या जन्मापासूनच त्याने भारताशी वैर मांडलेले आहे. त्यामुळे तो सातत्याने भारताला अस्थिर करण्यासाठी काही ना काही कारवाया करीत असतो. गेल्या अकरा वर्षांमध्ये मोदी सरकारच्या अस्तित्वामुळे तसेच ३७० कलम निष्प्रभ केल्यामुळे पाकिस्तानचा काश्मीरमधील उपद्रव खूपच कमी झालेला होता. परंतु मरणासन्न नागाने पुन्हा एकदा फणा काढून डंख मारावा तशा पद्धतीची ही आतंकवादी घटना घडलेली आहे. पाकिस्तान आमच्याशी १९४८, १९६५, १९७१, १९९९ हे चार युद्ध हरलेला आहे त्यामुळे त्याला या गोष्टीची जाणीव आहे की सरळ रणांगणावर आपण भारताशी युद्ध जिंकू शकत नाही. त्यामुळेच असे छुपे युद्ध आतंकवादाचा आश्रय घेऊन तो सातत्याने करीत असतो.

पूर्वी एक काळ असा होता की, ज्या काळामध्ये काश्मीर हे भारताचे अंग केवळ सैन्याच्या उपस्थितीमुळेच होते. तिथल्या प्रत्येक माणसाकडे तो आतंकवादी आहे की काय याच संशयाच्या नजरेने संपूर्ण जग बघत होते. तिथला तरुण हा भारतीय सैन्यावर दगडफेक करण्यासाठी ओळखला जात होता. तिथले नेते हे भारतविरोधी जहर ओकण्यासाठीच ओळखले जात होते.

३७० कलम निष्प्रभ होणे ही एक अशक्यप्राय गोष्ट आहे असे सर्व राजकीय पक्षांना वाटत होते. परंतु मोदी सरकारने सहा वर्षांपूर्वीच हे करून दाखविले. आणि त्यानंतर सर्वसामान्य भारतीय सुद्धा काश्मीरमध्ये जमीन विकत घेण्याच्या पात्रतेचा झाला. काश्मीरमध्ये पर्यटन उद्योग बहरला त्यामुळे सर्वसामान्य दगडफेक करणाऱ्या काश्मिरी तरुणाला सुद्धा काम मिळाले. जोपर्यंत काश्मीर केंद्रशासित होते तोपर्यंत सैन्याच्या हातामध्ये असल्यामुळे आतंकवादी आतमध्ये शिरकाव करू शकले नाही. भारतामध्ये विशेषत: हिंदू समाजामध्येच असे अनेक राजकीय पुढारी आहेत, वकील आहेत, कलाकार आहेत, ब्रिगेडी लोक आहेत, कम्युनिस्ट आहेत हे सर्वच नेहमीच मोदी सरकार आणि हिंदुत्व विचार करणाऱ्यांना आपले लक्ष्य करीत असतात. काश्मीरमध्ये सैन्याच्या गोळीने एखादा माणूस मारला गेला तरी सुद्धा मानवाधिकारचे किती उल्लंघन झाले असे छाती पिटून हे लोक रडत संपूर्ण जगाला सांगत असतात. सैन्यावर दगडफेक करणाऱ्या लोकांना जर रबराच्या गोळ्या मारल्या तरी सुद्धा त्या त्यांना जोरात लागतात व त्यामुळे



मानवाधिकाराचे उल्लंघन होते असे म्हणणारे लोक आहेत. यांच्या मते सैनिकाचा जीव हा जीव नाही आणि दगडफेक करणाऱ्याचा जीव हा जीव आहे. त्याला दिलेली शिक्षा ही मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. १९९० मध्ये तीन लाख काश्मिरी हिंदूंना काश्मीर सोडून भारतामध्ये पळ काढावा लागला, त्यांना निर्वासितांच्या छावण्यांमध्ये आपले जीवन काढावे लागले, ५०००० पेक्षा अधिक नागरिकांना, सैनिकांना आतंकवादामध्ये आपला जीव गमवावा लागलेला आहे. आताही हिंदू पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यानंतरही हे लोक काश्मिरातील कोणत्या ड्रायव्हरने कशी मदत केली, कोणी कोणाला कसे जेवू घातले या कथा सांगत आहेत. वास्तविकता ही आहे की आतंकवाद्यांनी प्रत्येकाला त्याचा धर्म विचारून, तो हिंदू आहे हे समजल्यानंतरच त्याला गोळी घातलेली आहे. काही लोक म्हणतात की हा द्वेष त्यांच्या मनामध्ये मोदीमुळेच निर्माण झालेला आहे. ही वैचारिक दिवाळखोरी आहे. हा मोदीद्वेष आहे. यापूर्वीही जेव्हा काश्मीरमध्ये काँग्रेसचे शासन असताना आतंकवादी हल्ले झाले त्यावेळेस हिंदुत्ववादी लोकांनी तर असे म्हटले नाही की मनमोहन सिंहमुळे हल्ले झालेले आहेत. मार्च २००० मध्ये छतीसिंगपुरा या अनंतनाग जवळील गावामध्ये आतंकवादी शिरले आणि त्यांनी ३५ शिखांची हत्या केली. आतंकवाद्यांच्या लक्ष्यावर नेहमीच हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन हे राहतात परंतु सर्वसामान्य मुसलमानांना त्यांनी कधीही मारलेले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे काश्मिरातील जनतेला आतंकवादी आणि पाकिस्तान हा संदेश देऊ इच्छितात की भारतापेक्षा आम्ही तुमच्या जवळचे आहोत. आम्ही तुमचे संरक्षक आहोत.

आजही हिंदू पर्यटकांची हत्या करण्यामागे आतंकवाद्यांचे आणि पाकिस्तानचे मनसुबे हेच आहेत. काश्मिरातील जनता आणि संपूर्ण देशातील जनता यांच्यामध्ये दरी निर्माण करणे हे त्यांचे प्रथम लक्ष्य आहे. भारत सरकार म्हणते की, काश्मीर हा भारताचा अभिन्न अंग आहे. परंतु पाकिस्तान काश्मिरातील जनतेलाच मानसिकदृष्ट्या भारतापासून तोडण्याचे प्रयत्न करीत आहे. देशामध्ये सुद्धा हिंदू-मुस्लिम अशा पद्धतीची दरी निर्माण करून देशाच्या विकासाला खीळ बसविण्याचे काम पाकिस्तान करीत आहे. ३७० कलम ज्या वेळेला निष्प्रभ करण्यात आले त्यावेळेला पाकिस्तानचा कितीतरी जळफळाट झाला होता. संपूर्ण जगाने सुद्धा याच्यावर चित्रविचित्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. तरीही पोलादी पुरुष नरेंद्र मोदी यांच्यामुळेच हे कार्य होऊ शकले. आताही देशातील जनतेला मोदी आणि अमित शाह यांच्याकडूनच अपेक्षा आहेत. देशातील लोकांच्या मनामध्ये या घटनेमुळे खूप मोठा राग आहे. त्या रागामधील एक पैलू हाही आहे की यापूर्वी काँग्रेसच्या काळामध्ये निरपराध हिंदूंना आपले प्राण गमवावे लागत होते. परंतु आता तर मोदी आणि शाह यांचे शासन आहे. या शासनामध्ये सुद्धा असे का व्हावे? परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की काश्मीरमधील आतंकवाद हा शे दोनशे लोकांचा आतंकवाद नाही तर हा पाकिस्तान पुरस्कृत म्हणजे एका देशाने पोसलेला आतंकवाद आहे.

काश्मीरमध्ये आजपर्यंत अनेक वेळा आतंकवादी हल्ले झालेले आहेत. परंतु यावेळेस पहिल्यांदा काश्मीरमधल्या मशिदींमध्ये सुद्धा मारल्या गेलेल्या हिंदू लोकांबद्दल प्रार्थना करण्यात आलेली आहे. शाळांमधून आणि मदरशांमधून सुद्धा मारले गेलेल्या लोकांबद्दल प्रार्थना करण्यात आलेली आहे. काश्मीरमध्ये विविध जिल्ह्यांमध्ये बंद पाळण्यात आलेला आहे आणि लोकांनी रस्त्यावर येऊन निदर्शने सुद्धा केलेली आहेत. मागच्या सहा वर्षांत काश्मिरातील जनतेला एक स्वतंत्रतेचा श्वास घेता आलेला आहे. त्यांना विकास आणि समृद्धी म्हणजे काय हे पाहता आलेले आहे. परंतु दुर्दैवाने पाकिस्तान या वेळेला यशस्वी झालेला आहे. मोदी आणि शाह हे पाकिस्तानला आणि आतंकवाद्यांना सोडणार नाही हे निश्चितच आहे. देशातील जनतेला याची प्रतीक्षा आहे. परंतु पाकिस्तानने हे लक्षात घेणे आवश्यक आहे की ''अबकी बार जंग छिडी तो नामो निशान नहीं होगा, काश्मीर तो होगा लेकिन पाकिस्तान नहीं होगा.''

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### धर्माच्या नावावर हिंसाचार खपवून घेणार नाही


कधी भारतातला एखादा प्रदेश मिळवण्यासाठी आतंकवाद होतो, तर कधी धर्माच्या नावाखाली आतंकवाद होतो. असामाजिक तत्त्व नवीन नवीन मुद्दे घेऊन हिंसा करायला पाहतात. अशा लोकांवर कठोर कारवाई व्हावी. जातपात, धर्म या नावावर हिंसा करून एकमेकांच्या धर्माविषयी तिरस्कार व तेढ निर्माण करायचा या असामाजिक तत्त्वांचा हा हेतू असू शकतो. मात्र आता सर्व धर्मीयांनी एक होऊन या घटनेचा निषेध करायला हवा आणि दाखवायला हवे की आता धर्माच्या नावावर भारतीय हिंसाचार सहन करणार नाही. भारतीयजनता प्रत्येक संकटात एकजुटीने लढते. ती धर्मनिरपेक्ष आहे हे दाखवून द्यायला हवे. कारण या देशातला प्रत्येक नागरिक कुठल्याही धर्माचा होण्याच्या आधी भारतीय आहे. आपण सारे एक होऊन हे दाखवून देण्याची आज काळाची गरज आहे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

●● ●●

### पाकिस्तानी नागरिकांना सीमेबाहेर काढा

काश्मीर अनेक वर्षांच्या शांततेनंतर पुन्हा अशांत झाला. स्थानिक अतिरेक्यांच्या मदतीशीवाय पहलगामचा हल्ला शक्य नाही हे समजलं. स्थानिक काही लोक अजूनही खातात इथे व गुण गातात पाकिस्तानचे असे आहेत. तेच खरे अतिरेकी आहेत. आता त्यांचा खात्मा करण्याचे धोरण केंद्र सरकारने आखले आहे. त्याचाच एक भाग म्हणून कूटनीती म्हणून भारतात व्हिसा घेऊन आलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी ताबडतोब देश सोडायचा आहे. असा आदेश आल्यावर पोलिस यंत्रणा, संबंधित खात्याचे अधिकारी जागे झाले व आपापल्या क्षेत्रात किती व्हिसाधारक पाकिस्तानी आहेत याचा शोध घेऊ लागले. नागपुरातही तसा शोध झाला आणि वृत्तपत्रात बातमी आली की जवळपास २४०० च्या वर पाकिस्तानी नागरिक नागपुरात आहेत. मुख्य म्हणजे त्यांचा प्रवेश हा आरोग्यसेवेसाठी, नागरिकांच्या आकस्मिक, नैमित्तिक भेटीसाठी झाला आहे. परंतु या मंडळींनी चक्क आपला व्यवसाय इथे टाकला आहे. आता त्यांना पाकिस्तानात जायची इच्छा नाही. आपल्या मुलाबाळांचे कसे होणार ही चिंता आहे. आपण भारतीय किती गाफील असतो नाही? पैसे खाऊन हेतुपुरस्पर दुर्लक्ष करणारे रक्षक, चाकरमाने इथे आहेत की नाही? आपल्या बाजूला नवीन धंदेवाला आला आहे त्याची माहिती बाजूच्या



दुकानदाराला नसते हे दुर्दैव आपलेच ना? स्थानिक आमदार, नगरसेवक, नेते त्यातील काही लोकांच्या मांडीला मांडी लावून ''और कैसे भाईजान'' म्हणणारे आहेत ना? एखाद्या दर्ग्याची जबाबदारी देता देता आपण त्यांना चक्क आयोगच देऊन टाकतो ना? दोन-तीनशेच्यावर मत तुम्हाला मिळत नसताना उगाच आरोग्य शिबिर आपण त्यांच्यासाठीच भरवतो ना? इतके सगळे घडल्यावरही त्यांच्याच दुकानातून आपण वस्तू खरेदी करतो ना? असे कितीतरी प्रश्न मांडता येतील. ज्या कारणासाठी व्हिसा दिला ते पूर्ण झाल्यावर आपल्या देशात न जाता इथे व्यवसाय करणे हे कसे चालू शकते. या निमित्ताने का होईना पोलिस विभाग, नेते मंडळी यांनी आता बिलकूल दयामाया दाखविण्याची गरज नाही. एकेकाला पकडून सीमेबाहेर करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### दहशतवाद्यांची नांगी ठेचा!

पहलगाम येथील हिंदू पर्यटकांच्या हत्येची निंदा करावी तेवढी कमी आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी आपले प्राण दिले पण हिंदू धर्म बदलविला नाही. त्याचा द्वेष औरंग्याला आला आणि संभाजी राजांचा अमानुष छळ करून मारणारा औरंग्या इथेच शिवरायांच्या महाराष्ट्रात गाडला गेला. त्याच औरंग्याच्या औलादींनी हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून मारले. आतंकवादी हे पाकिस्तानातील असल्याने निंदाजनक घटनेचा प्रतिशोध घेताना व्याप्त काश्मीर आता भारताने ताब्यात घेण्याची कारवाई केली पाहिजे. काश्मीर खोऱ्यात असलेली पाकिस्तानी मानसिकता तीव्रतेने भारताला अनुकूल होणे शक्य नाही. हिंदू पर्यटकांवर बेछूट गोळीबार करण्यात आला. तेथील पर्यटकांवर आपत्ती आली असता मदतीला धावून येणारी स्थानिक यंत्रणा उभी नव्हती. पर्यटकांच्या पैशावर डल्ला मारणारी टोळी उभी होती. हिंदूंना काफीर समजणाऱ्या कट्टरपंथीय लोकांचा फक्त काश्मीरमधील पर्यटकांच्या केवळ पैशावर डोळा आहे. मानवतेचे सोंग घेऊन काश्मीर खोरे मानवतावादी असल्याचा पुरोगामी आव आणला गेला आहे. अर्बन नक्षल्यांपासून सावध राहण्याची आवश्यकता आहे. आपण जिथे आहात तिथे आपला हिंदू धर्म संस्कृतीचा मानसन्मान करणाऱ्यांबरोबर त्यांच्या सोबत आपले आर्थिक व्यवहार करा. हेच आपले धर्मरक्षणाचे आजचे कार्य आहे.

पाकिस्तानला सिंधू नदीचे पाणी देणार नाही हा कणखर निर्णय भारताच्या नेतृत्वाने घेतला. कारण सिंधू नदीचे पाणी हिंदुस्थानचे आहे. हिंदुस्थानात अस्थिरता माजविणाऱ्यांना उपासमारीचे चटके बसल्यावर समजेल की आपण हिंदुस्थानच्या उपकारावर जगत आहोत. हिंदुस्थानच्या उपकाराची परतफेड पाकड्यांनी आतंक माजवण्यात केली. पाक समर्थित आतंकवादाने हजारो निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अशा विकृत जमातीची नांगी ठेचण्यासाठी विश्वातील देश भारतासोबत असल्याने भारत आता सिद्ध झाला आहे.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए –३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी –८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उघड्यांवर मांस विक्री करणाऱ्या २७ दुकानांवर नगर पालिकेची धडक कारवाई

## पोलिस बंदोबस्तात काही दुकानांना सील ठोकले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
शहरातील पेन्शनपूरासह इतर भागात उघड्यांवर मांसविक्री करणाऱ्या २७ दुकानांवर नगर पालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. रस्त्यावर साहीत्य ठेवणाऱ्याचे साहीत्यही नगर पालिकेच्या पथकाने जप्त केले असून काही दुकानांना सील ठोकण्यात आले आहे.
शहरातील पेन्शनपुरासह इतर भागात काही दुकानांतून उघड्यांवर मांस विक्री होत होती. दुकानांच्या समोरच ठाण मांडून त्या ठिकाणावरून मांस विक्री होत होती. त्यामुळे या भागात दुर्गंधी पसरत आहे तसेच नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. अनेकांना आजार निर्माण होत असल्याची तक्रारी नगर पालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर नगर पालिकेने संबंधित मांस विक्रेत्यांना सूचनाही केल्या होत्या. मात्र मांस विक्रेत्यांनी याकडे दुर्लक्ष चालविले होते. या प्रकारानंतर रविवारी सकाळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या उपस्थितीमध्ये अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, जमादार अशोक धामणे, धनंजय क्षीरसागर, संतोष करे तसेच नगर पालिकचे पथक यांनी अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली. पथकाने पेन्शनपुरा भागात सुरू असलेल्या उघड्यांवर मांस विक्रीच्या दुकानावर कारवाईला सुरूवात केली. यावेळी काही दुकानदारांनी रस्त्यावर त्यांचे साहीत्य ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. नगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर ठेवलेले साहीत्य जप्त करीत ट्रॅक्टरमध्ये भरले. यावेळी काहीजणांनी विरोध करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला परंतु नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे आणि पोनि पाडळकर यांनी नियमानुसार कारवाई सुरू केली. यावेळी पथकाने काही दुकानांना सीलही ठोकले.
पथकाने उघड्यांवरील मांस विक्री करणाऱ्या १० दुकानातील मांस जप्त करून नष्ट केले तसेच या दुकानदारांना नोटीस देखील दिल्या आहेत. याशिवाय १५ दुकान दारांकडून रस्त्यावर गाडे व इतर साहीत्य ठेवून मांस विक्री केली जात असल्याने त्यांचे गाडे व साहीत्यही जप्त करण्यात आले आहे. शहरातील गंगा नगर, सुराणा नगर या भागातही मोठ्या प्रमाणावर उघड्यांवर मांस विक्री सुरू असून या दुकानांवरही कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# भारतीय जनता पक्षाच्या विभागीय आढावा बैठकीत मार्गर्शन

## कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
भारतीय जनता पक्षाच्या संघटन पर्व अंतर्गत हिंगोली, नांदेड, लातूर, परभणी जिल्हा विभागाची गाव/वस्ती संपर्क अभियानाची आढावा बैठक हिंगोली येथे भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.
हिंगोली, नांदेड, लातूर, परभणी जिल्ह्यातील प्रत्येक लहानमोठ्या वाड्या-वस्त्यांवर संघटनात्मक मजबुतीसाठी करण्यात येणाऱ्या कृती योजना, आगामी कार्यक्रमांची आखणी आणि पक्षाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या संघटन पर्वाच्या माध्यमातून पक्षाची वाड्या-वस्त्या व ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी असलेली नाळ अधिक बळकट होत असून, हा उपक्रम जनसामान्यांपर्यंत पक्षाचा विचार पोहोचविणारा ठरत आहे.
बैठकीच्या सुरुवातीलाच पहलगाम दहशतवादी हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या भीषण घटनेत निष्पाप जीव गमावलेल्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. दहशतवाद्यांच्या भ्याड कृत्यांचा तीव्र निषेध आहे. याप्रसंगी भाजपा संघटन मंत्री संजय कोडगे ,मंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, खासदार अजित गोपछडे, आमदार तानाजीराव मुटकुळे, आमदार राजेश पवार, आमदार भीमराव केराम, आमदार सुनील गायकवाड, माजी आमदार रामराव वडकुते, माजी आमदार गजाननराव घुगे, जिल्हा अध्यक्ष फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सचिव किरण पाटील यांच्यासह हिंगोली, नांदेड, लातूर, परभणी जिल्ह्यातील प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, मंडल अध्यक्ष व इतर प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औद्योगिक वसाहतीत २० वर्षानंतर स्वतंत्र फिडर मिळाला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
शहरानजीक लिंबाळा मक्ता या भागात असलेल्या औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांची मागील २० वर्षापासून स्वतंत्र फिडर बसविण्यात यावी अशी मागणी होती. नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी काही दिवसांपूर्वी उद्योजकांसोबत औद्योगिक वसाहतीला भेट देत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या. जिल्हाधिकारी यांच्या पुढाकारामुळे येथील औद्योगिक वसाहतीमध्ये आता स्वतंत्र फिडर बसविण्यात आल्यामुळे उद्योजकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.
लिंबाळा मक्ता येथील औद्योगिक वसाहतीमध्ये लहान मोठे उद्योजक आहेत. २२० केव्ही उपकेद्रातून औद्योगिक वसाहतीच्या ३३ केव्ही उपकेंद्राला वीज पुरवठा केला जात होता. त्याठिकाणावरून औद्योगिक वसाहतीतील गावांना देखील वीज पुरवठा होत होता. या उपकेंद्रावर सुमारे पाच ते सहा फिडरवर औद्योगिक वसाहतीचे फिडर होते. त्यामुळे फिडरवरील एखाद्या गावात वीज पुरवठ्यामध्ये दुरूस्ती किंवा तांत्रिक दोष निर्माण झाल्यास सर्वच फिडरचा वीज पुरवठा खंडीत होत होता. उद्योगामध्ये उत्पादन सुरू असतांना अचानक वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे उत्पादन थांबल्याने उद्योगांना मोठा फटका बसत होता. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उद्योजकांची समस्या जाणून घेवून वीज कंपनीला सूचना दिल्या. त्यानंतर वीज कंपनीने दि २८ एप्रिल रोजी उद्योजकांसाठी नवीन ट्रान्सफार्मर बसविले आहे. त्यामुळे वसाहतीला २४ तास वीज पुरवठा मिळणार आहे.



**हिंगोली- भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, शासकीय कंत्राटदार यांची आढावा बैठक घेतली असून अधिकारी व कर्मचाऱ्यांना मंजूर झालेली विकासाची कामे पावसाळ्यापूर्वी दर्जेदार करण्याच्या सूचनाही दिल्या. यावेळी ॲड के के शिंदे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन



हिंगोली- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्राम पातळीवर ग्रामपंचायत स्तरावर विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांनी दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी जनसहभागासह विविध उपक्रम राबवून लोकसेवा हक्क दिन साजरा करावा. नागरिकामध्ये अधिनियमाची तसेच ऑनलाईन उपलब्ध सेवाबाबतची जनजागृती करावी. यासाठी सेवा हक्क दिनाचे आयोजन दि २८ एप्रिल रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयायाचे नियोजन सभागृहात करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्यासह विविध विभागातील अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सेवा हक्क दिनाचे महत्व विशद करीत मार्गदर्शन केले. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला.

### महाराष्ट्र गौरव यात्रेचे हिंगोलीत स्वागत



हिंगोली- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने राज्यात महाराष्ट्र गौरव यात्रा काढण्यात आली असून दि २८ एप्रिल रोजी तालुक्यातील नर्सी नामदेव येथून ही गौरव यात्रा निघाली होती. या यात्रेचे हिंगोली येथे आगमन होताच जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यख बी डी बांगर, केशव दुबे यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी गौरव यात्रेचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वागत करण्यात आले. या यात्रेमध्ये बंजारा महिलांनी पारंपारीत वेशभूषेमध्ये नृत्य सादर केले तसेच आदीवासी बांधवांनीही पारंपारीक वेशभुषा परिधान करीत आदीवासी नृत्य सादर केले. याशिवाय भजनी मंडळी, ढोल ताशे, फटाक्यांची आतिषबाजीही करण्यात आली. ही गौरव यात्रा संपूर्ण मराठवाड्यात जाणार आहे.

# हिंगोली हज यात्रेकरूंची आरोग्य तपासणी तसेच लसीकरण शिबीर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
शहरातील मस्जिद मेराजच्या प्रांगणामध्ये जिल्हयातून हज यात्रा २०२५ करीता जाणाऱ्या १२० हज यात्रेकरूचे आरोग्य तपासणी व लसिकरण शिबीर ठेवण्यात आले होते. यावेळी हज यात्रेकरूनी आरोग्य तपासणी आणि लसीकरण करून घेतले.
सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानीजिल्हा खिदमतुल हुज्जाज कमिटीचे अध्यक्ष हाजी एकबाल वासेसा तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गोपाल कदम वैद्यकिय अधिकारी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक हाजी अब्दुल जबारखान तर सुत्र संचालन सलीम शेख यांनी केले. तसेच असगर सचिव हज कमिटी जिल्हा हिंगोली यांनी मनोगत व्यक्त करून हज यात्रेकरूला संबोधीत केले, डॉ. गोपाल कदम, डॉ. दुर्गादास कंठे यांनी हज यात्रेकरूना आरोग्य विषयक महत्वाच्या सूचना दिल्या. याकामी जिल्हा शल्यचिकित्सक विभागातील डॉ. फैसल पठाण , श्रीमती सुजाता पहूरकर जावेदभाई आणि आरोग्य विभागालील अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इरफान थारा उपाध्यक्ष, हाजी सय्यद इब्राहीम उर्फ शफीभाई, हाजी इसा, डॉ. जहीरोहीन, जहीरभाई इटवाले, अब्दुल गणी बागवान कळमनुरी, हाफेज शकील मेराजी, मोहम्मद कलीम, हाजी सय्यद इकबाल, डॉ. मुंतजीब पठान, सुफीयान पठाण, शेख रिझवान, अल्ताफ पठाण, हनीफ बागवान, नजीरखा पठाण गुत्तेदार, नासेर सलीम बागवान, आबेदअली जहागीरदार, इस्माईल, पठाण एहसान खान सुपर समाचार, मोहम्मद अमान,डॉ. बिलाल, डॉ. फैसल अली, मौलाना अफजल प्यारेवाले, सय्यद शकील स.मुसा, स.अरबाज स.शफी, हाजी कैसर अहेमद, इबादुर रहेमान उर्फ शाहेद, अब्दुल कय्युम मौलाना, मोहम्मद नाजीम रजवी, हाजी वाजीद युसुफ, सर्व सदस्य खिदमतुल हुज्जाज कमिटी जिल्हा हिंगोली उपस्थित होते.

# घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
मंदिरावरील दानपेटी तसेच घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे.
शहरातील ग्रामदैवत खटकाळी हनुमान मंदिराची दानपेटी चोरट्यांनी चोरून नेली होती. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोनि विकास पाटील यांना सददील गुन्ह्यांचा तपास करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थागुशाच्या पथकाने गोपनीय रित्या माहीती घेवून आरोपी रामदास गजानन पवार रा कामठा आणि अज्जू उर्फ अजीम अनिस माकोडे रा आर्णी यांना अटक केली. त्यांच्याकडून १ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून हिंगोली जिल्ह्यात ९ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. सदरील कामगिरी उपनि विक्रम विठुबोने, कपील आगलावे यांच्या पथकाने केली आहे.

# हिंगोलीत अमृत स्वायत्त संस्थेचा अमृत वर्ग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**
शहरातील दत्त मंदिर मंगळवारा येथे अमृत वर्ग घेण्यात आला यात अमृत स्वायत्त संस्थेच्या किशोर वईन विकास उपक्रमांतर्गत बाल आणि किशोर वईन विद्यार्थ्यांचा अमृत वर्ग घेण्यात आला ज्यात मुलांना शिस्त, अनुशासन, स्मरणशक्ती, योग साधना, गीत आणि बौद्धिक अश्या बऱ्याच विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले तसेच शारीरिक मध्ये बैठे खेळ आणि मैदानी खेळ घेण्यात आले आणि राष्ट्र प्रेम जागृत करण्याबाबत राष्ट्रीय घोषणा सुद्धा शिकविण्यात आल्या अमृत वर्ग यशस्वी करण्यासाठी जिल्हा व्यवस्थापक श्रीकांत धोत्रे, जिल्हा उपव्यवस्थापक उल्हास दिवाळकर, अमृत संगणक मित्र संजय मेथेकर, अमृत सहप्रमुख शुभम भालेराव, अमृत सखी उर्मिला देशपांडे तसेच सहाशिक्षिका रश्मी आजेगांवकर यांनी विशेष प्रयत्न केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा, विविध कामांचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ एप्रिल**
वसमत येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा तसेच विविध विकास कामांचे भूमीपूजन पार पडले.
यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवचादी पक्ष संघर्षातून मोठा झाला आहे. कोणावरही अन्याय करायचा नाही तर कोणी चुकीचे वागले तर अन्याय सहनही करायचा नाही असा सल्ला यावेळी त्यांनी दिला.
यावेळी पुढे बोलतांना पवार म्हणाले की, राज्यात कृषी पंपाचे वीज देयक माफ केल्यानंतर शासनाला १९ ते २० हजार कोटी रूपये भरावे लागत आहे. राज्यातील निराधारांना लवकरच दर महिन्याला त्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यासाठी नियोजन सुरू आहे. दिव्यांग, महिला बाल कल्याण विभागालाही निधी दिला आहे. यावेळी आ.



राजू नवघरे, आ, विक्रम काळे, माजी मंत्री नवाब मलिक, प्रवक्ते सुरज चव्हाण, तानाजी बेंडे, रामदास पाटील सुमठाणकर, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, कांचन शिंदे, बालू मामा ढोरे, जिजा हरणे, शहराध्यक्ष मुजीब पठाण, त्र्यंबक कदम, संजय दराडे, चंद्रकांत दळवी, केशव दुबे, दत्तराव इंगोले, सचिन भोसले, विश्वनाथ फेगडे, आशीर्वाद इंगोले, असद कादरी, गौतम दवणे, आशीर्वाद इंगोले, गजानन कदम, बालाजी मिरकुटे, मा कपिल सोनटके, प्रशांत शिंदे, बोखरे पाटील, ऋत्विक कदम आदींची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी सामुहीक विवाह सोहळा, गुंज येथील पीडीत कुटुंबाना प्रत्येकी ५० लाख धनादेशाचे वाटप आणि विविध विकास कामांचे भूमीपूजन केले.शेख हबीब तांबट, यासर तांबट, हारून दालवाले, नदीम सौदाग यांच्यासह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

# लोहा उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची हेळसांड

## आमदार चिखलीकरांची थेट राज्याच्या आरोग्य सचिवाकडे तक्रार



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२८ एप्रिल-**

लोहा उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सुविधांचा बोजवारा उडाला असून वैद्यकीय अधीक्षक ,डॉक्टर मुख्यालयी राहत नाहीत वेळेवर रुग्णालयाला उपचार मिळत नाहीत .अनेक रुग्ण नातेवाईक दररोज थेट प्रतापरावांना दवाखान्याच्या तक्रारी करत असतात.असुविधा , तक्रारीचा ढीग , डॉक्टर वेळेवर नसतात त्यामुळे येथे उपाचाराला येणारे लोक त्रस्त झाले आहेत .त्याची दाखल घेत रविवार दुपारी आमदार प्रतापराव पाटील यांनी रुग्णालयाची पाहणी केली.असुविधा व तक्रारी पाहता स्वतः राज्याच्या आरोग्य सचिवाला येथील वैदयकीय अधीक्षक व डॉक्टर याची बदली करा असे सूचित केले. जिल्हाशक्यचिकित्सक यांनी लक्ष घालावे तसेच पाण्याची तात्काळ सुविधा करण्याचे निर्देश दिले

लोहा उपजिल्हा रुग्णालयाच्या वाढत्या तक्रारीची दाखल घेत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी रविवारी दवाखान्याच्या भेट दिली .,उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नीळकंठ भोसीकर, रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अब्दुल बारी, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, माजी सभापती खुशाल पाटील पांगरीकर ,माजी उपनगराध्यक्ष दता वाले ,भास्कर पाटील , पंचशील कांबळे डॉ लोहारे, बी डी जाधव, यासह कर्मचारी उपस्थिती होते.

लोहा रुग्णालयात आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला आहे .वैद्यकीय अधीक्षक राहत नाहीत आणि डॉक्टर वेळेवर नसता त्यामुळे रुग्ण व नातेवाईक त्रस्त झाले आहेत .अनेकदा रुग्ण नातेवाईकांनी आमदार चिखलीकर याच्याकडे डॉक्टर नाहीत .कोणीच पाहिनात . पाण्याची सोय नाही असा अनेक तक्रारी केल्या त्याची तातडीने दाखल घेत स्वतः रखरखत्या उन्हात रविवारी दुपारी आमदार प्रतापराव यांनीं उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी केली. असुविधा पाहून त्यांनी थेट राज्याचे आरोग्यमंत्री यांचाच फोन केला त्यानंतर राज्याचे आरोग्य सचिव याना लोहा उपजिल्हा रुग्णालय म्हणजे राज्यातील सर्वात असुविधा देणारे हॉस्पिटल आहे .,येथील वैदयकीय अधीक्षक यांना तात्काळ बदला तसेच डॉक्टर स्टॉप अन्यत्र बदली करा .माझ्या भागातील जनतेला आरोग्य सेवा मिळत नाही . यावर तातडीने कार्यवाही व्हावी असे सांगितले . जिल्हा शक्य चिकित्सक डॉ नीळकंठ भोसीकर यांना या रुग्णालयाकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्या एका हंगामी डॉक्टर बाबत जाहीरपणे निर्देश दिले.

रुग्णालयात पाण्याची सोय नाही त्यावर तात्काळ उपाय योजना करा व पाण्याची सोय तात्काळ सुविधा उपलब्ध व करावी असे मुख्याधिकारीश्रीकांत लाळगे याना निर्देश दिले .लोह्याच्या उपजिल्हा रुग्णालया च्या सुविधा बाबत येत्या। आठवड्यात मुंबईत आरोग्य मंत्र्यांसोबत बैठक घेऊ व येथील रुग्णालयात अद्यावत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करू असे आ चिखलीकर यांनी आश्वासित केले.

# वादळी वाऱ्याने फळबाग शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२८ एप्रिल-**

शनिवारी रात्रीच्या सुमारास झालेल्या तूरळक पावसाच्या सरी सह जोरदार झालेल्या वादळी वाऱ्या मुळे आंबा फळबाग शेतकऱ्यांचे मोठ्या संख्येने फळ गळती झाली, होटाळा शिवारा तील झाडावर विज पडून मुक्या प्राण्यांच्या वैरणासह शेती उपयो गी अवजारे जळून खाक झाली आहे.

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबईने दि.२५ एप्रिल रोजी वर्तविलेल्या अंदाजानुसार नायगाव तालुक्यातील शनिवारी सायं काळी चार पासुन वातावरणात अचानक पणे बदल झाला आणि अचानक जोरदार वादळी वाऱ्यासह तूरळक पावसाच्या सरी पडा यला सुरुवात झाल्याने बेमौसमी येणाऱ्या पाऊस वादळी वाऱ्या मुळे तालुक्यातील आंबा फळबागांचे फळगळती होऊन खूप मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे.तर होटाळा शिवारातील आखाड्या शेजारील झाडा वर विज पडून शेजारील मुक्या जनावरांचे कडबा या सारख्या वैरणाला आग लागून काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि बाजूस असलेल्या आखाड्याने ही पेट घेऊन

आखाड्यातील सर्व शेती उपयोगी अवजारे जळून नष्ट झाली.तर याच सुमारास नरसी येथील शाम नगरातील



शेख मैनोद्दीन दुगांव वाले यांच्यासह आनेकांच्या घरावरील टीनपत्रे उडून जावून हवेत घिरट्या घालत होते. हे दृश्य पाहून जिवाच्या आकांताने प्रत्येक व्यक्ती हा सैरावैरा आडोशाचा आश्रय शोधत होता.आशा ह्या शनिवारी झालेल्या बे मौसमी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे नायगांव तालुक्यातील फळ बाग शेतकऱ्यांसह अनेकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### विष्णुपुरी ग्रामपंचायतीत आपले सरकार सेवा केंद्राचे लोकार्पण

**नवीन नांदेड-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ग्रामपंचायत विष्णुपुरी येथे आपले सरकार सेवा केंद्र दिनांक २८ एप्रिल रोजी नांदेडचे उपजिल्हाधिकारी अजय शिंदे व उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मंजुषा कापसे-जाधव तसेच सरपंच ग्रामपंचायत विष्णुपूरी सौ.संध्या विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते या केंद्राचे लोकार्पण संपन्न झाले. विष्णुपुरी ग्रामपंचायतीचे येथे आपले सरकार सेवा केंद्र नांदेड जिल्ह्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट सेवा केंद्रांमध्ये स्थान पटकावल्याचा विशेष गौरव या प्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी (एमआरईजीएस) अमित राठोड यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी कानोडे यांनी केले. या कार्यक्रमास ग्रामपंचायत विष्णुपूरी चे उपसरपंच अर्चनाताई विश्वनाथराव हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, तंटामुक्ती अध्यक्ष माणिकराव हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे, सेवानिवृत्त पीएसआय माधव भारती महाराज, माजी सैनिक शिवाजीराव हंबर्डे, सेवानिवृत्त पीएसआय उत्तमराव हनवते, माजी सैनिक प्रभाकर हंबर्डे, गोविंदराव हंबर्डे, माजी सरपंच संतोष बारसे, संगणक ऑपरेटर अग्रसेन हंबर्डे, संतोष हंबर्डे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक व अंगणवाडी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मुदखेड शहरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा उत्साहात

**मुदखेड -**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महोत्सव सोहळा उत्साहात पार पडला या निमित्त खिचडी व बुंदी लाडुचे वाटप करण्यात आले असून महामानवास अभिवादन करण्यासाठी आमदार श्रिजया चव्हाण यांनी उपस्थिती लावली होती. मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र भिमनगर नयाआबादी, अशोक नगर, लुंबिनी नगर, रेल्वे कॉलनी, समता नगर, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव सोहळ्याचे दि.२७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते या निमित्त भंतेजी व उपासक यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात येऊन बुद्ध वंदना घेण्यात आली. विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या वतीने महामानवास अभिवादन करण्यात आले यावेळी आमदार श्रिजया चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, करीम खां साहब, भाजप शहराध्यक्ष रामसिंह चव्हाण, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, जयंती मंडळाचे अध्यक्ष राजू चौदंते, सुर्यकांत चौदंते,अविनाश चौदंते, रुशिकेश चौदंते मोहम्मद गौस, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठ्ठान, शिवकांत देवके, रत्नाकर तारु वांगीकर, राहूल चौदंते, बुद्धभुषन गंगाधर थोरमोटे, विक्रांत गोद्रे, प्रदिप कांबळे, बंटी देवकांबळे, कपील लोखंडे, अशोक डोंगरे यांची उपस्थिती होती. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वर्गीय निवृती गंगाराम खंडेलोटे यांच्या स्मरणार्थ साहेबराव खंडेलोटे, दिक्षा खंडेलोटे,व खंडेलोटे परिवाराच्या वतीने एक क्विंटल बुंदिचे लाडू वाटप करण्यात आले या सोबतच एक हजार बीसलरी बॉटल्सचे वाटप करण्यात आले. महात्मा फुले चौक मित्रमंडळाच्या वतिने अन्नदान वाटप करण्यात आले. चौदंते परिवाराच्या वतीने आयोजित अन्नदान वाटपाच्या कार्यक्रमात आमदार श्रिजया चव्हाण यांनी उपस्थिती लावली या नंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवरुन महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सार्वजनिक जयंती मंडळाने महामानवाचे आदर्श विचार आचरण करण्याची सामुहिक शपथ घेतली



# शासन प्रतिनिधी म्हणून काम करणे हे आमचे कर्तव्यच : इंद्रनील नाईक



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२८ एप्रिल-**

शासनाचा प्रतिनिधी म्हणून सामान्य माणसाची कामे करणे हे आमचे कर्तव्य असून शासन विकासात्मक कामे करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी परोटी तांडा येथे बोलताना व्यक्त केले.

हरित क्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे भूमिपूजन व नागरी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन दि. २८ एप्रिल सोमवार रोजी परोटी तांडा येथे करण्यात आले. या कार्यक्रमास आ. भिमराव केराम, आ. बाबुराव कदम कोहळीकर, बेबीताई प्रदीप नाईक यांची उपस्थिती लाभली होती. सर्वप्रथम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सहस्त्रकुंड येथील महादेव मंदिराचे दर्शन घेऊन ट्रस्ट व ग्रामपंचायत वाळकीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला .येथील कार्यक्रम आटोपून परोटी तांडा येथील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे त्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी मंत्री नाईक यांचे लेझीम संचासह बंजारा वेशभूषेत जोरदार रित्या स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला सुरवात करण्या पूर्वी दिपप्रज्वलन करून मंत्री इंद्रनील नाईक ,आ. केराम ,आ. कोहळीकर यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला . सहस्त्रकुड धबधब्याच्या खाली उच्च पातळी बंधारा मंजूर करण्यात यावा यासह अन्य मागण्या बाबत गावकऱ्यांच्या वतीने व परिसरातील नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी आ. केराम, आ.कोहळीकर , बेबीताई प्रदीप नाईक यांनी व मंत्री इंद्रनील नाईक यांनी देखील या भागातील विकासात्मक कामासाठी ज्या ज्या विभागाची मागणी आहे त्या विभागाच्या मागणीचा आढावा घेऊन मागणी पूर्ण करू असे मंत्री नाईक यांनी बोलताना म्हणले .

# डॉ. आंबेडकरांचे विचार जपने हिच खरी भीमजयंती : आ. तिडके



**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि.२८ एप्रिल-**

दगडगाव येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली त्या प्रसंगी ते बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की सध्या तरुणांनी व्यसनाच्या मागे सोडून बाबासाहेबानी जे आपणास विचार आचार आणी अन्याया विरुद्ध लढण्याची जी ताकद दिली तोच विचारांचा ठेवा आपणास सर्व समाज बांधवानी पुढे घेऊन जाण्याची सद्या गरज आहे आणी ती आपण पूर्ण करणे हेच बाबासाहेब यांना अपेक्षित आहे असे प्रतिपादन नांदेड दक्षिण चे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केले यावेळी व्यासपीठावर दक्षिण चे तालुका प्रमुख अशोक मोरे, उद्धव पाटील, ज्ञानोबा मोरे इतर मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते यावेळी सरपंच प्रकाशराव नवरे यांनी सर्व पाहुण्यांचा सत्कार केला.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रध्दांजली

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि.२८ एप्रिल-**

काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या अमानवीय दहशतवादी हल्ल्यात निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या क्रूर कृत्याचा निषेध करण्यासाठी आणि मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी निवघा व्यापारीच्या संघटण्याच्या वतीने वतीने दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी सोमवारी सकाळी लोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लावून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मंगळवारी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात पाकीस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. ज्यात पर्यटनासाठी आलेल्या २८ निष्पाप भारतीय पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यु झाला. तर अनेक पर्यटक, स्थानिक व्यावसायिक, नागरिक जखमी झाले. या हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली असून या

घटनेबाबत देशभरातुन तीव्र रोष व्यक्त केला जात असून केंद्र सरकारने पहेलगाम, सह जम्मू काश्मीर मधील सर्व पर्यटन स्थळाची सुरक्षा व्यवस्था अधिक चोख करावी आणि दहशतवाद्याना धडा शिकवावा असा व्यापारी संघटनेच्या वतीने निषेधात्मक भाषणातून काढला. हल्ल्यातील मृतांच्या आत्म्यास शांती लाभावी यासाठी प्रार्थना केली

करुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात केली. दहशतवादी हल्ले हे मानवतेवर घाला घालतात. पहलगाममधील निष्पाप निष्पाप भारतीय पर्यटक नागरिकांची हत्येची घटना ही प्रत्येक भारतीयांच्या मनाला अतिशय वेदना देणारी असून केंद्र सरकारने यासारख्या घटनांवर कठोर निर्णय घेण्याची आणि जशास तसे ठोस उत्तर देण्याची गरज असल्याचे सांगत तुम गोली चलाओ हम सीने पर खायेंगे तुम्ह सर काटोगे यहा दस सर उठायेंगे और ये हिंदुस्तान की मिट्टी है है साहाब या हर घर से भगतसिंग निकल कर आएंगे अशा. या कार्यक्रमाला व्यापारी संघटनेच्या उपाध्यक्ष राम कदम डॉक्टर तावडे सर मनोज कदम मा सरपंच संदीप कदम पाटील अनंत जैन डॉक्टर सचिन जैन यशवंत देशमुख आधी सह व्यापारी बांधव उपस्थित होते..

# भाजपाच्या रामसिंग चव्हाण यांची फौज कामाला बूथ प्रमुख, पन्ना प्रमुखांनी बांधली संघटन मोट

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२८ एप्रिल-**

भाजपचे नवनियुक्त नव्या उमेदीचे शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी संघटन पर्व अभियानासाठी पुढाकार घेतला असून बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख यांनी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध माहिती प्रत्येक घरात पोहचविण्याचा निर्धार केला असून घर चलो अभियानासाठी फौज कामाला लागली आहे.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आ रविंद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार भाजप तालुकाध्यक्ष व शहराध्यक्ष निवडिची प्रक्रिया नुकतीच पुर्ण करण्यात आली आहे. मुदखेड तालुक्यात भाजप संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, महानगर कार्याध्यक्ष अमर राजूरकर यांचे निकटवर्तीय व विश्वासू समजले जाणारे दत्तु देशमुख वाडीकर यांची तालुकाध्यक्ष पदी तर शहराध्यक्ष पदी राम सिंह चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. नव्या उमेदिच्या पदाधिकार्यांनी आता शहरात भाजप संघटन पर्व अभियान जोमाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

भोकर विधानसभा आमदार श्रिजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मोट बांधली जात आहे भाजप शहराध्यक्ष रामसिंह चव्हाण यांनी बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख यांची बैठक घेऊन घर



तिथे कार्यकर्ता तसेच एक पन्ना २० कुटुंब अशी नियोजन आखनी केली आहे. भाजप केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती शहरातील प्रत्येक घरात पोहचविण्याचा निर्धार केला आहे. जुन्या निष्ठावंत पदाधिकार्यांना सोबत घेऊन मोर्चा बांधनी केली जात आहे जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, माजी तालुकाध्यक्ष बालाजी खटींग, शंकर मुतकुलवाड, हनुमंत देशमुख, माजी शहराध्यक्ष संजय सोनटक्के, मुन्ना चांडक, गोविंद गोपनप्पले, कालिदास जंगीलवाड, कानोबा बिसमिल्ले, प्रभाकर पांचाळ, संतोष सावंत, विनोद शर्मा, अमोल आबादार यांच्या संकल्पनेतून अभियानाचा अजेंडा तयार करण्यात आला आहे. घर चलो अभियान राबविण्यासाठी माजी नगराध्यक्ष सुनिल शेट्टे, उत्तम चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष माधव कदम, संजय आऊलवार, गंगाधर डांगे, इम्रान मच्छिवाले, अब्दुल कादीर, रावसाहेब चौदंते, श्याम चंद्रे, पंडरीनाथ सुर्यवंशी, कुणाल चौदंते, चांदू बोकेफोड, विजय मेटकर यांच्यासह आदिंनी पुढाकार घेतला आहे.

# भगवान परशुराम जन्मोत्सव अत्यंत साधेपणाने साजरा होणार

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२८ एप्रिल-**

भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तालुका हदगाव जिल्हा नांदेड तर्फे दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.त्या अनुषंगाने या वर्षी सुद्धा विविध धार्मिक , सामाजिक उपक्रम राबवून जन्मोत्सव सोहळा साजरा करण्याचे आयोजन झाले होते.मात्र दि.२२एप्रिल २०२५ रोजी जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे पाक पुरस्कृत अतिरेक्यांनी निरपराध हिंदू तरुणांवर व भारतीय व्यक्तींवर गोळीबार करीत त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. ही घटना अत्यंत निंदनीय तथा हिंदू समाजावर आघात करणारी आहे. त्यामुळे यंदाचा भगवान परशुराम जन्मोत्सव हा साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तालुका हदगाव तर्फे घेण्यात आला आहे.



श्री भगवान परशुराम जन्मोत्सवा निमित्ताने हदगाव शहरातून काढण्यात येणारी भव्य शोभायात्रा इतर कार्यक्रम या निंदनीय घटनेमुळे रद्द करण्यात आले आहे. यावर्षी २९ एप्रिल २०२५ संध्याकाळी ५ वाजता श्री सत्य गणपती मंदिरा समोर हदगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन भगवान परशुरामाचे प्रतिमेचे पूजन करून परशुराम जन्मोत्सव साजरा करावा तसेच या भ्याड हल्ल्याचा निषेध करून या हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व बांधवां सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार असल्याचे ब्राह्मण महासंघातर्फे कळविण्यात आले.

# उमरी तालुक्यातील ५८ ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२८ एप्रिल-**

उमरी तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणासाठी दि २५ एप्रील रोजी उमरी तहसील कार्यालयात परिसरात उपविभागीय अधिकारी धर्माबाद स्वाती दाभाडे व तहसीलदार प्रशांत थोरात यांच्या मार्गदशनानुसार आरक्षण सोडत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली आहे .

ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कार्यकाळासाठी आहे उमरी तालुक्यात एकूण ५८ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा निर्णय घोषित करण्यात आला आहे यामध्ये महिलांसाठी एकूण ३१ सरपंच पदे राखीव ठेवण्यात आली.तर वर्गीकरण केल्यास अनुसूचित जातीसाठी ११ पदे अनुसूचित जमातीसाठी ५ पदे नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १३ पदे तर खुल्या प्रवर्गासाठी २९ पदे ठेवण्यात आली आरक्षण आराखडा तालुक्यासाठी पुढील प्रमाणे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर अनुसूचित जमाती - पुरुष १ )हिरडगाव २ )रामखडक ३)चिंचाळा पउ ४ ) ईश्वरनगर /दुर्गानगर ५)इज्जतगाव /अमदापुर ) अनुसूचित जाती महिला करिता आरक्षित ६ ) सावरगाव कला महिला ) ७) पळसगाव महिला ९)बितनाळ महिला १०) गणपुर महिला ११ ) बोळसा बु/खु महिला १२) हुन्डा प.उ महिला /अनुसूचित जमाती करिता आरक्षित १३ ) शिरूर पुरुष १४) हंगिर्गा पुरुष / अनुसूचित जमाती महिलाकरिता आरक्षित १५) निमटेक महिला १६ ) कारला महिला १७) कळगाव महिला /नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १८)कावलगुडा बु.पुरुष १९)नागठाणा बु. पुरुष २०)महाटी/ येंडाळा पुरुष २१ ) वाघाळा पुरुष २२ ) मनुर पुरुष २३ ) हन्डा पुरुष /ना .मा. प्र.महिला करता आरक्षित २४) जिरोण महिला २५) बेलदरा / नियादादपुर महिला २६) जामगाव महिला २७) तुराटी महिला २८ )धानोरा बु.महिला २९)वागलवाडा महिला ३०) शेलगाव महिला सर्वसाधारण खुल्या साठी ३१)कारला पुरुष ३२ )गोळेगाव पुरुष ३३) बिजेगाव पुरुष ३४)नागठाणा खु.पुरुष ३५ )तळेगाव पुरुष ३६)सावरगाव द पुरुष ३७) कौटगाव पुरुष ३८ ) बोरजुनी पुरुष ३९ )मंडळा पुरुष ४० ) बोथी पुरुष ४१ ) हस्सा पुरुष ४२ ) हातनी पुरुष ४३ ) ढोल उमरी पुरुष ४४) सोमठाणा प.उ पुरुष ४५ )भायगाव महिला ४६) शिवणगाव महिला ४७) आस्वलदी महिला ४८ ) सिंधी महिला ४९ ) बळेगाव महिला ५० ) बोळसा ग.प महिला ५१ )गोरठा महिला ५२) ईळेगाव महिला ५३) कावलगुडा खु.महिला ५४) रहाटी खु.महिला ५५ ) कुदळा महिला ५६ ) मोखंडी महिला ५७) शिंगणापूर महिला ५८) फुलसिंगनगर /वसंत नगर महिला अब्दुलापुर महिला याप्रमाणे जाहीर करण्यात आले आहे या आरक्षण यादीतून स्पष्ट होतो की महिला व मागास घटकांना व्यापक प्रतिनिधित्व देण्यात आले असून ग्रामपंचायत यादीतून अधिक समतोल व सर्वसमावेश नेतृत्व पुढे येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे आरक्षण प्रक्रियेच्या सोडती करिता , उमरी तालुक्यातील एकूण ५८ गावांचे आरक्षण सोडत दि .२५ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी स्वाती दगडे यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत तहसील कार्यालय उमरी येथे दुपारी तीन काढण्यात आले ही संपूर्ण प्रक्रिया इन कॅमेरा करण्यात आली. यावेळी उमरीचे तहसीलदार प्रशांत थोरात, नायब तहसीलदार संजय देवराय नायब तहसीलदार के.एम देसटवाड पंचायत ग्राम महसूल अधिकारी डी. डी. गंगामारे, कदम एम.राऊत अनिल वाघमारे प्रभू खानसोळे राजूत, पाटील, पांडे व विस्तार अधिकारी ,मोटरवार यांच्यासह अनेक कर्मचारी महसूल सेवक राजेश राठोड कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतली .


## जाहिर प्रगटन

नोंदिचा प्रकारःखरेदी
माहिती मिळालेचा दि.२३/०४/२५
फेरफाराचा दि.२४/०४/२५

लिहून देणारःअविश विवेक गंदेवार,अशोक दत्तात्रय गंदेवार,दिपक दत्तात्रय गंदेवार रा.भोकर(खाता क्र.३२४८)यांचे गट/सर्व्हे क्रमांक ६०६लागवडी योग्य क्षेत्र २.८१३६हे.आर.चौ.मी.पैकी लागवडी क्षेत्र ०.००६६ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी सदरील गट नं.६०६मध्ये कै.दत्तात्रय मारोतीअप्पा गंदेवार यांनी हयात असताना ह्या प्लॉट विक्रि केला होता आज रोजी त्याच्या वारसाच्या नावे असून करिता नोंद करण्यात आली.

समंती देणारे खातेदार१)शेख नबी शेख चाँद (खाता क्र.०)शेख रसूल शेख चाँद(खाता क्र.०)दस्त क्र.५९७/१९८४दि.०३/१०/१९८४२(२)माधवराव किशनराव दंडवे (खाता क्र.०) दस्त क्र.११८/१९८७दि.०९/०२/१९८७(३)जैबूनिसाबेगम गफूरसाब खाता क्र.(०)

लिहून घेणारःशेरखाँ गफूरखाँ पठाण (खाता.क्र.१०३२३)गट/सर्व्हे नं.६०६लागवडी योग्य क्षेत्र ०.००६६हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.दूय्यम निबंधक भोकर जि.नांदेड यांचेकडिल खरेदी दस्त क्रमांक १४०६दि.०९/११/२०२०प्रमाणे रक्कम रुपये १९७५०००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले. उक्त फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफाराच्या नोंदवहिवरुन मला वाटते उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उपरोक्त जमिन आहे त्या गावचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे सूचना देत आहे हि सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदिसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्या फर्मावित आहे पंधरा दिवसाच्या आत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल.

ग्राम महसूल अधिकारी
तलाठी साझा भोकर

## संक्षिप्त वृत्त...

### श्री.भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त सेलूमध्ये भव्य पारंपारिक शोभायात्रेचे आयोजन



**सेलू,/प्रतिनिधी-** श्री.भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त सेलू येथील श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ०४:३० वाजता भव्य पारंपारिक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.
या निमित्ताने श्री गायत्री माता मंदिर,परभणी रोड येथे मंगळवारी सकाळी ०७ वाजता श्री भगवान परशुराम मुर्तिला महाअभिषेक सायंकाळी ०९ वाजता श्री केशवराज बाबासाहेब महाराज मंदिरात महाआरती होणार आहे. पारंपारिक शोभायात्रेमध्ये प्रमुख आकर्षण श्री भगवान परशुराम यांची ८ फुट भव्य मूर्ती, श्री.रेणुकामाता माहुरगड देवीचा भव्य ८ फुट मुखवटा,श्री भगवान परशुराम यांची पालखी,सजीव देखावे,ढोल ताशा पथक,महिला मंडळ, महिला टाळपथक,कलशधारी महिला,लेझीम पथक, मुलींचे मर्दानी खेळ,म्युझिकल व्हॅन,भव्य अतिशबाजी,डी.जे विविध संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने जयत तयारी करण्यात आली आहे. शहरातील मुख्य रस्त्याने पारंपारिक शोभायात्रा निघणार आहे. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी शोभायात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. शोभायात्रा व विविध कार्यक्रमांमध्ये सर्व समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त आज भव्य शोभायात्रा

**परभणी,/प्रतिनिधी :** 'तुम्ही - आम्ही, भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या' वतीने मंगळवार २९ एप्रिल रोजी भगवान श्री परशूराम जन्मोत्सवानिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.
मंगळवारी सायंकाळी ५ वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातील पेढा हनुमान मंदिर येथून या भव्य शोभायात्रेस प्रारंभ होणार असून गांधी पार्कातील राजाराम सभागृह येथे यात्रेचा समारोप होणार आहे. समाजातील सर्व महिला व बांधवानी जास्तीत जास्त संख्येने या शोभायात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन तुम्ही - आम्ही, भगवान परशुराम जन्मोत्सव समिती परभणीच्या वतीने करण्यात आले आहे.

### महसूल विभागाचा आकृतीबंध तत्काळ मंजूर करा - कर्मचारी संघटनेचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे

**परभणी,/प्रतिनिधी :** दांगट समितीच्या शिफारशीनुसार महसूल विभागाचा आकृतिबंध तत्काळ मंजूर करावा, अशी मागणी परभणी जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.
उपमुख्यमंत्री पवार हे शनिवारी परभणी जिल्हा दौऱ्यावर आले असता परभणी जिल्हा महसूल कर्मचारी राज्य उपाध्यक्ष नानासाहेब भेंडेकर, परभणी जिल्हाध्यक्ष प्रकाश गोरे यांनी त्यांची भेट घेऊन राज्यातील महसूल विभागाचा आकृतीबंध वित्त विभागाकडून मंजूर होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्याअनुषंगाने चर्चाही केली. त्यावर उपमुख्यमंत्री पवार यांनी लवकरच महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार यांना समक्ष बोलून नेमका कुठे अडथळा आहे? याची माहिती घेतो असे आश्वासन दिले.
दरम्यान, यावेळी संघटनेच्या वतीने उपमुख्यमंत्री पवार यांना आपल्या मागण्या संदर्भातील निवेदन सादर केले. त्याद्वारे, महसूल विभागाचा आकृतिबंध सन २०१६ ला मंजूर करण्यात आला. सन २०१६ साली नवीन आकृतिबंध मंजूर न झाल्यामुळे आजही त्याच आकृतिबंधाप्रमाणे अव्वल कारकून पदसंख्या आहे. सन २०१७ मध्ये महसूल विभागाच्या आकृतिबंधासाठी नेमलेल्या दांगट समितीच्या अहवालाप्रमाणे त्या मंजूर करण्याबाबत शासनामार्फत आश्वासन देण्यात आले होते. परंतु, अद्यापही आकृतिबंधास वित्त विभागाकडून मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे महसूल विभागात सद्यःस्थितीत पूर्वीच्या आकृतिबंधानुसार तीस ते पस्तीस टक्के पदे रिक्त आहेत, असे नमूद करीत सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून महसूल विभागातील प्रलंबित आकृतिबंध मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष नानासाहेब भेंडेकर, जिल्हाध्यक्ष प्रकाश गोरे, जिल्हा सरचिटणीस पंचशीलकरुणा बगाटे, प्रवीण कोकांडे, विठ्ठल मोरे, सिद्धेश्वर फड, रणजित भाले, प्रशांत हसारीकर, मोहम्मद अजीम, गोपाळ पाटील, रियाज हे उपस्थित होते.

### सेलूतील शिबिरात ४२ दात्यांचे रक्तदान

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील महेश नगरातील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक व बाल संस्कार केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी नामजप यज्ञ सोहळा सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ४२ दात्यांनी रक्तदान केले.
रक्तदान शिबिराचे उद्घाटन पद्माकर कुलकर्णी, साईराज बोराडे, नागेश कुलकर्णी, केंद्र प्रतिनिधी संजय गव्हाडे व परमेश्वर तमखाने यांच्याहस्ते झाले. या रक्तदान शिबिरात एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या मध्ये महिलांची संख्या अधिक होती. रक्त संकलन शासकीय रक्तकेंद्र डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड यांनी केले. रक्त संकलनासाठी डॉ. राहुल क्षीरसागर, प्रकाश सुरनर अतुल ताकसाडे, सतीश चिंचल, सय्यद अझम आदींनी सहकार्य केले.
दरम्यान, श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा सप्ताहामध्ये प्रहर सेवा दिवस रात्र नाम जप श्री स्वामी समर्थ सारअमृत,विनावादन, माळजप, सकाळी ८ ते रात्री ८ महिला व रात्री ८ ते सकाळी ८ पुरुष सेवेकरी सेवा देत होते.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# समातंर पाणीपुरवठा व भुमिगत गटार योजना लागणार मार्गी

## आ.डॉ.राहुल पाटील यांच्या पाठपुराव्यास यश



**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी शहरातील समांतर पाणी पुरवठा योजना,भूमिगत गटार योजना आणि रखडलेले नाट्यगृह हे प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले आहेत. त्यामुळे लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल अशी माहिती आ.डॉ. राहुल पाटील यांनी दिली.
परभणी शहरात समांतर पाणीपुरवठा योजना व भूमिगत गटार योजना मार्गी लागावी तसेच रखडलेले नाट्यगृह पूर्ण व्हावे यासाठी आ.डॉ.राहुल पाटील हे मागील काही दिवसापासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. दोन दिवसापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार परभणी येथे आले होते, त्यावेळी देखील आ.पाटील यावर तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली त्यानुसार मंत्रालयामध्ये आज सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनात बैठक पार पडली.या बैठकीला पालकमंत्री मेघना बोर्डीकर,अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल आ.डॉ.राहुल पाटील वित्त विभागाचे सचिव गोपाल देवरा तसेच नगर विकास खात्याचे सचिव श्री गोविंदराज उपस्थित होते तर ऑनलाईन पद्धतीने आमदार राजेश विटेकर जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे आयुक्त धर्यशील जाधव उपस्थित होते.
यावेळी आ.राहुल पाटील यांनी शहराला समांतर पाणीपुरवठा गरजेचे आहे हे पटवून दिले तसेच भूमिगत गटार योजना झाल्यास शहरातील सांडपाण्याची व्यवस्था मार्गी लागेल याबाबत माहिती दिली. त्यावर अजितदादा यांनी तात्काळ समांतर पाणीपुरवठा योजनेला निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना वित्त विभागाच्या सचिवांना दिल्या .तसेच भूमिगत गटार योजना लवकर सुरू करावी असे आदेश दिले. परभणीतील रखडलेल्या नाट्यगृहासाठी १३ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला तसेच तालुका क्रीडा संकुलासाठी कृषी विद्यापीठ परिसरात २५ एकर जमीन, मलनिस्सारण प्रकल्पासाठी दहा एकर आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी १८ एकर जमीन देण्याचे जाहीर करण्यात आले.
परभणी शहराचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी गेल्या कित्येक महिन्यापासून केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून अजित दादा यांनी सकारात्मक भूमिका घेत आपण सादर केलेले सर्व प्रस्ताव आणि मागण्या मान्य केल्या आहेत, त्यामुळे लवकरच ही कामे सुरू होतील असा विश्वास आहे असे आ.राहुल पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.


### जिंतूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ची आढावा बैठक संपन्न



**जिंतूर,/प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिंतूर चे नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत यांच्या अध्यक्षतेत व सुरेश भैय्या नागरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.
या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या सभासद नोंदणी संदर्भात सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून जास्तीत जास्त सभासद नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिंतूर तालुक्याच्या विविध आघाड्यांच्या तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यामध्ये जिंतूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभाग तालुकाध्यक्षपदी गजानन वऱ्हाड, जिंतूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विमुक्त जाती भटक्या जमाती विभाग तालुकाध्यक्षपदी अमित राठोड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जमाती तालुकाध्यक्षपदी दिलीप माघाडे यांची नियुक्ती करण्यात आली तसेच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्ष संघटने संदर्भात पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सुरेश नागरे नानासाहेब राऊत,तालुका अध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत अविनाशराव काळे,राजेंद्र नागरे,अनंतराव कोरडे,केशवराव बुधवंत,बासु पठाण,राजेश चव्हाण,विनायक आडे,उस्मान खा पठाण, रामजी घुगे,जाबेर मुल्ला,गंगाधर आघाव हाशम भाई, सुधाकरराव घुगे, कुबेर हुलगुंडे,गणेश पवार,संजय घुले,प्रभाकर आघाव, भारत घुगे,गुलाब चौधरी, तहसीन देशमुख, नाना निकाळजे,वाजीद कुरेशी, गोविंद घुले, रामेश्वर मुधवर, मुजाहेद कादरी,अंशल लाला,रावसाहेब खंदारे,लखन कुरे, गणेश काकडे, अर्जुन वजीर,संदीप घुगे, सुधाकर दराडे, जगनराव काळे,आकाश चऱ्हाटे, रामा वाघ, अनिल सूर्यवंशी, सुभाष राठोड, विष्णू सानप, अमीन भाई, मुरली राठोड,आदींची उपस्थिती होती.

### प्रिन्स इंग्लिश स्कुलचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश







**सेलू,/प्रतिनिधी:** येथील एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे. पाचवी व आठवी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण प्राप्त करत शाळेचे नाव उंचावले आहे. पाचवी इयत्तेतील तिन्ही क्रमांक प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवले.
प्रेरणा बाबासाहेब काष्टे हिने २७६ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. उन्नती विजयकुमार राठी हिला २६८ गुणांसह द्वितीय क्रमांक, तर प्रज्वल प्रमोद रोडगे याने २५६ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. या विद्यार्थ्यांच्या अथक मेहनतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. याशिवाय इतर उच्च गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शिवराज सूर्यवंशी (२१८ गुण),ब्रह्मास्मि शिंदे (२०२ गुण),आरुष धावळे व आशिष झोडगे (१८८ गुण),दुर्वा नंद (१८६ गुण),शिवप्रिया बोराडे (१८४ गुण), अविनाश घुमरे (१७६ गुण), अक्षरा भाबट व ऋषभ बोकण (१७४ गुण),तसेच अद्वैत लेंगुळे व आरुष कांबळे (१७० गुण),यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेचा अभिमान वाढवला आहे.
आठवी इयत्तेमध्येही प्रिन्स इंग्लिश स्कूलचे यश आठवी इयत्तेत सानवी मारेवार व वरद कुटे यांनी संयुक्तपणे २४२ गुण मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर कृष्णा काकडे याने २२६ गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. आठवीच्या इतर उल्लेखनीय गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कार्तिक अबुज (२१८ गुण), हर्षल जाधव (२१४ गुण),पियुष राठोड (२१० गुण), तनिष्का पुण्डकर (२०८ गुण), स्नेहा कवळे (१८८ गुण), मयंक पुरी व स्वप्निल गंगे (१७८ गुण), संध्या तायनाक (१७६ गुण) व तेजस खापरखुंटीकर (१७६ गुण) यांचा समावेश आहे.सर्व विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी अभिनंदन केले.

### जिंतूर भारतीय जनता पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी गोविंद थिटे तर शहराध्यक्षपदी विलास भंडारी यांची निवड



**जिंतूर -** भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१ एप्रिल रोजी परभणी येथे भारतीय जनता पार्टी कार्यालयात बैठक पार पडली. जिंतूर भारतीय जनता पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी तालुक्यातील युवा नेतृत्व गोविंदराव थिटे पाटील यांची फेरनियुक्ती करण्यात आली. त्याचबरोबर जिंतूर शहर अध्यक्ष म्हणून येथील माजी नगरसेवक विलास भंडारी यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने निरीक्षक अधिकारी यांना पाचारण करण्यात आले होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर, नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष गोविंद थिटे पाटील, माजी नगरसेवक प्रताप देशमुख, सुरेश भुमरे, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष माधव दराडे, जाधव उपस्थित होते.

### सेलू येथे रक्तदान शिबिर; महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू :** भगवान परशुराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने सेलू येथे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः महिलांचा सहभाग उल्लेखनीय ठरला. सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात एकूण ८२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये ११ महिलांचा आणि ७१ पुरुषांचा समावेश होता. सर्वांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून रक्तदान केले.
या उपक्रमाचे आयोजन श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीने केले होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी समितीने विशेष मेहनत घेतली. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, सेलू परिसरात सामाजिक भान आणि एकोप्याची भावना अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त केली. यावेळी विविध समाजबांधवांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला.


### नखाते आश्रमशाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा

#### पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत चार विद्यार्थी पात्र



**सेलू,/प्रतिनिधी- :** येत्या शैक्षणिक सत्रापासून लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत पहिली वर्गासाठी सीबीएसई अभ्यासक्रमाच्या पार्श्वभूमीवर श्रीमती शांताबाई नखाते प्राथमिक आश्रमशाळा वालूर येथे २६ एप्रिल शनिवारी १ ली मधील विद्यार्थ्यांचा प्रवेश सोहळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला.
अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शाम मचाले हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य रमेश नखाते,वसतीगृह अधिक्षक भारत दरफडे, शेख जावेद,उपमुख्याध्यापक संजय वाशिंबे यांची उपस्थिती होती.
महाराष्ट्र दिनी निकाल जाहीर जाहीर करून उन्हाळी सुटी लागणार आहे. तर दुसरीकडे येत्या शैक्षणिक सत्रापासून नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत पहिली वर्गासाठी सीबीएसई अभ्यासक्रम असणार आहे. पार्श्वभूमीवर उन्हाळी सुट्टीत पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला जावा या हेतूने २६ एप्रिल शनिवारी १ ली मधील विद्यार्थ्यांचा प्रवेश सोहळा घेण्यात आला.यावेळी पहिल्या वर्गात प्रवेशीत विद्यार्थ्यांसोबत पालक हजर होते.यावेळी विद्यार्थ्यांना दप्तर व पुस्तके देऊन त्यांचे स्वागत केले.प्रास्ताविक दत्तात्रय खोमणे यांनी केले तर सूत्रसंचालन निलेश गडम यांनी केले.गणेश रेडेवाड यांनी आभार मानले.यशस्वीतेसाठी उध्दव झिंजान,प्रसाद ढोकर,पाराजी जाधव,वंदना चौधरी,राजेंद्र पाटोळे, महेश राऊत,मिना फंड,योगेश गिराम, महेंद्र कदम,सुनिल गोरे,वैष्णवी ढोले,रेवणअप्पा साळेगावकर,सुरेश ढोले यांनी पुढाकार घेतला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार.
पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या अनुष्का योगेश मगर, अंजली प्रभाकर चांदणे ,राहुल पांडुरंग खरबे,संस्कार सचिन बोराडे चार विद्यार्थ्यांसह श्रेया,आयएएस,बिडीएस परिक्षेतील गुणवंत १९ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### प्रा.नामदेव लटपटे यांना एज्युकेटर अवॉर्ड



**गंगाखेड-** गंगाखेड येथील कै. सौ.शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.नामदेव कुंडलिकराव लटपटे यांना आयुष फाउंडेशनद्वारे दिल्या जाणारा राष्ट्रीय स्तरावरील एज्युकेटर अवॉर्ड-२०२५ मिळाला आहे.
हा अवॉर्ड प्रा.लटपटे यांनी दिलेल्या शैक्षणिक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून सामाजिक सेवा कार्याचा सन्मान असून.
प्रा.लटपटे यांनी आपल्या शैक्षणिक,संशोधन व सामाजिक कार्यातून आलेल्या अनुभवातून ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने शोध लिखाण केलं आहे. त्याबद्दल मित्रपरिवारातून अभिनंदन होत आहे.

## १ मे पासून जिल्हयात कंपोस्ट खड्डा भरु- सीईओ माथूर यांचे आवाहन

**मोहन धारासूरकर**
**परभणी ,/प्रतिनिधी-** राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !' या अभियानात गावातील ग्रामस्थ, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी, तरुण युवक मंडळ, शाळा, अंगणवाडी, प्रा.आ.केंद्र यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार नतिशा माथूर यांनी केले आहे.
ग्रामीण भागातील सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करुन गावांना दृश्यमान स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळविण्याकरीता तसेच नागरिकांच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी जिल्ह्यामध्ये 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' या अभियानाला १ मे पासून राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने सुरुवात करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने राज्यभर गावागावांमध्ये हे अभियान दिनांक १ मे ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे. या अभियानामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील आमदार, खासदार तसेच ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवावा म्हणून राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री.ना.गुलाबराव पाटील यांनी आवाहन पत्र देखील पाठविले आहे.
विविध टप्प्यात या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी अभियानाला सुरुवात करण्यात येणार आहे. १ मे ते १० मे या कालावधीत गावातून कचरा जमा करून नाडेप भरण्यात येणार आहे. ११ मे ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत नाडेप प्रक्रिया, देखभाल व पडताळणी करण्यात येणार आहे. १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत नाडेप खड्डा उपसण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. हे अभियान प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये यशस्वीपणे राबविण्या बाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सूचित केले आहे.






दरम्यान, ग्रामीण भागातील नागरिकांनी ओला आणि सुक्या कचऱ्याचे योग्य ते नियोजन करावे, तसेच ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तसेच गांडूळ खत निर्मिती करण्याची प्रक्रिया अभियान कालावधी मध्ये करण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींनी आपले योगदान द्यावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवराज केंद्रे यांनी केले आहे.

॥ उसंतवाणी ॥
१४९३



काश्मीरी हल्ल्याने । भारत शोकात ।
ऐशोआरामात । कोण तिथे ॥१॥

बैठकही झाली । सर्वपक्षीयांची ।
लागली कोणाची । अनुपस्थिती ॥२॥

पळाले विदेशी । सोसेना उन्हाळा ।
राज्य सोसे झळा । अवघ्याची ॥३॥

कुटुंब घेऊन । गाठले लंडन ।
ढन ढना ढन । मौजमजा ॥४॥

देशावर जमा । युद्ध काळे ढग ।
यांना नाही धग । कशाचीही ॥५॥

जनतेला म्हणे । बोंबलत बसा ।
उद्धवाचा वसा । हाचि खरा ॥६॥

कांत राजकीय । नाही जरा भान ।
विरोधी महान । नेतृत्व हे ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२७ एप्रिल २०२५

# पहलगाम हल्ल्याच्या निषेध बिडकीन बाजारपेठ बंद



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २७ एप्रिल पैठण तालुक्यातील बिडकीन येथे पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ दि २७ रविवार रोजी व्यापारी व नागरिकांनी सर्व व्यवहार शंभर टक्के बंद पाळत निषेध व्यक्त केला आहे, आतंकवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या बंदमध्ये जीवनावश्यक व आरोग्य सेवा, मेडिकल, दुध डेअरी, वगळता सर्व दुकाने व्यवहार शंभर टक्के बंद ठेवण्यात आले होते,या बंद मध्ये सर्व समाज बांधवांनी सहभाग घेतला असून तसेच बिडकीन बजरंग दल कार्यकर्त्यांनी बंद साठी अधिक परिश्रम घेतले या दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडवून म्हणून ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड व अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह मॅडम,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे यांच्या आदेशाने बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना, एस एस कदम, संजय चव्हाण, महादेव निकाळजे, हनुमान धनवे, संदीप धनेधर, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर, आदी पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## ४२ डिग्री तापमानात विजेने फोडला पैठणकरांना घाम

पैठण :- सोमवारी दुपारी महावितरणने पैठणकरांना चांगलाच घाम फोडला. झाले असे की पैठण छत्रपती संभाजीनगर रोडवरील शहरालगत असलेल्या हॉटेल सह्याद्री जवळ महावितरण कडून केबल बदलण्याचे काम हाती घेण्यात आले त्यासाठी दुपारी १ वाजेपासून ते ५ वाजेपर्यंत संपूर्ण शहराचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होता. त्यामुळे ४२ डिग्री सेल्सिअस तापमानात महावितरणने नागरिकांना चांगलाच घाम फोडला. काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे पर्यटकांवार झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. याचा निषेध म्हणून सोमवारी पैठण कडकडीत बंद पाळण्यात येऊन बसस्थानक चौकात पाकिस्तानचा निषेध करून मृत बांधवाना श्रद्धांजली वाहण्यात आली. बंद काळात नागरिकांनी आपल्या घरीच राहणे पसंत केले असता विद्युत पुरवठा नसल्याने भर उन्हात त्यांना दिवसभर उकिरडा जाणवला. दरम्यान हॉटेल सह्याद्री जवळ महावितरण कडून केबल बदलण्याचे काम सुरू असल्याने काम संपेपर्यंत पैठणचा विद्युत पुरवठा सायंकाळी ५ :१० वाजेपर्यंत खंडित झाला असल्याची माहिती महावितरणचे शाखा अभियंता वंगाळ यांनी दिली.


# गांव बस्ती चलो अंतर्गत भाजपचे स्वच्छता अभियान



पैठण दि २८ :- संपूर्ण देशात भारतीय जनता पक्षाच्या वतीने गांव बस्ती चलो अभियान राबविला जात असून यासाठी पैठण तालुक्यात तालुका अध्यक्ष दत्ता पाटील वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

तालुक्यातील विहामांडवा,आपेगांव, एरंडगांव,ईसारवाडी,ढोरकीन, बिडकीन, पाचोड येथे गाव बस्ती चलो अभियान अंतर्गत मारुती मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.भाजपा मंडळाध्यक्ष पैठण तालुका दत्ता पाटील वाकडे, विलास पाटील संत सुलोचनाताई साळुंके,अनंत पाटील औटे,संतोष एरंडे ,माऊली गाभूळ आत्माराम उरुणकर,निखिल गुप्ता, सुरज घुले यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी या अभियानात सहभाग घेतला.

## कै.बाबूरावजी काळे शाळेतील साई बोखारे,वेदिका बावस्कर,वेदिका पवार याविद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश


साई बोखारे


वेदिका बावस्कर


वेदिका पवार

सोयगाव, दि.२८ एप्रिल महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा दि.९ फेब्रुवारी-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूलचे साई योगेश बोखारे,वेदिका समाधान बावस्कर,वेदिका गणेश पवार हे विद्यार्थी पात्र झाल्याबद्दल शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा जोतीताई काळे,सचिव देविना काळे-भटकर,संचालक शिवदीप काळे,संचालिका सुनयना शिवदीप काळे,संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे सह शिक्षक,शिक्षिका यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पैठण येथील श्रीमहानुभाव दत्त मंदिर विकास आराखड्यास उच्चाधिकार समितीची मान्यता




छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- पैठण येथील ऐतिहासिक व महानुभाव पंथाचे महत्त्वाचे तीर्थस्थळ असलेल्या श्रीमहानुभाव दत्त मंदिराच्या विकास आराखड्याचे आज मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकारी समिती समोर सादरीकरण झाले. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या आराखड्यात काही बदल सुचवत या आराखड्यास मान्यता देण्यात आली व सुधारीत आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

दुरदृष्य प्रणालीद्वारे हे सादरीकरण झाले. राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासमोर हे सादरीकरण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, पैठण नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शेवलीकर आदी जिल्हा मुख्यालयातून उपस्थित होते.

श्रीमहानुभाव दत्त मंदिर ट्रस्ट हे महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी यांच्याशी संबंधित आहे. ११८९ च्या सुमारास चक्रधर स्वामी या भागात वास्तव्यास होते. श्री स्वामी त्र्यंबकेश्वर ते राहेर या समग्र गोदावरी काठी विहार करीत. येथेच त्यांनी आपल्या अनुयायांना उपदेश केले. त्यामुळे हे स्थळ महानुभाव पंथियांसाठी महत्त्वाचे आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला. त्यात भक्तनिवास, सभागृह, ग्रंथालय, स्वच्छता गृह, वाहनतळ व परिसर सुशोभिकरण आदी कामे करण्यात येणार आहेत. या आराखड्यात मुख्यसचिव श्रीमती सौनिक यांनी व समिती सदस्यांनी काही फेरबदल सुचविले. पर्यावरण पूरक रचना व सौर उर्जेचा अधिकाधिक वापर, तसेच वृक्ष लागवड, पदपथ आदी दुरुस्त्या सुचविल्या. त्यानुसार आराखडा सुधारीत करुन पुन्हा सादर केला जाईल. या संदर्भात दि.१० मे नंतर पुढील बैठकीत अंतिम निर्णय होईल,असे सांगण्यात आले.

# जिल्हाधिकाऱ्यांची संकल्पना बालहक्क संरक्षणाची पंचसूत्री; १ मे पासून जिल्ह्यात अंमलबजावणी

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- बाल कामगार, बाल भिक्षेकरी, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य आणि बाल विवाह या सर्व समस्यांचे समूळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी 'पंचसुत्री; बालहक्क संरक्षणाची' हा कालबद्ध कार्यक्रम तयार केला असून सर्व संबंधित विभागांमार्फत महाराष्ट्र दिन अर्थात दि.१ मे पासून या कार्यक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु होत आहे.

बालकामगार, बाल भिक्षेकरी, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य आणि बालविवाह या सारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कामगार विभाग, महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पोलीस अशा विभागांनी संयुक्तपणे हा उपक्रम राबवावयाचा आहे.

दि.१ मे पासून हे अभियन सुरु होईल. त्यात बाल कामगार आढळण्याची शक्यता असलेली ठिकाणे शोधून धाडसत्र राबवून बालकामगारांची सुटक करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. या उपक्रमात कामगार विभाग, जिल्हा कृती दल सदस्य, विशेष बाल पोलीस पथक, बाल कल्याण पोलीस अधिकारी, चाईल्ड हेल्पलाईनचे अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कर्मचारी ही कारवाई करतील. ३१ मे पर्यंत हे अभियान पूर्ण होईल. त्याच धर्तीवर बाल भिक्षेकरी हुडकून त्यांनाही भिक्षा मागण्यापासून परावृत्त करुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात येईल. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी हे अभियान राबवतील.त्याच प्रमाणे दि.१ ते १५ मे या कालावधीत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे (माध्यमिक व प्राथमिक) शिक्षणाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी मनपा हे शाळा बाह्य मुलांचे शहरी व ग्रामिण भागात सर्व्हेक्षण राबवतील. त्यानंतर त्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणतील.बालकांच्या आरोग्या संदर्भात १ ते ३१ मे दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात येईल. त्यात सध्या उष्णतेशी लढा, लसीकरण, जीवनसत्व विषयक डोस, किशोरवयीन बालकांचे स्वास्थ्य, मान्सिक आरोग्य, पोषण आहार या विषयी घरोघरी जाऊन जाणीव जागृती करण्यात येईल. या उपक्रमात प्राथमिक आरोग्य केंद्र, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका सहभागी होतील. १ मे ते ३० जून या कालावधीत बालकांच्या हक्कांबाबत जाणीव जागृतीचे अभियान राबविण्यात येईल. त्यात बालकांचे हक्क, बालकांविषयीचे कायदे, शाळा सुरक्षा नियमावली, बाल संरक्षण इ. बाबत माहिती देण्यात येईल. या उपक्रमात प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभाग सहभागी होईल. शहरी भागात मनपाचे शिक्षणाधिकारी हा उपक्रम राबवतील.

या अभियानाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पोलीस निरीक्षक हे या समितीचे सदस्य असतील. बालविकास प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीने वेळोवेळी या उपक्रमाचा आपापल्या तालुक्यात आढावा घेऊन संनियंत्रण करावे व अभियान राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

# पारदर्शक व सौजन्यशील सेवा हा लोकांचा अधिकार : दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागामार्फत पारदर्शकतेने व सौजन्यशील सेवा लोकांना द्यावी. अशी सेवा मिळणे हा लोकांचा अधिकार असून त्या उद्देशानेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा तयार करण्यात आला आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याच्या दशकपुर्तीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हादिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, उमाकांत पारधी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, लोकांची सेवा करण्यात एक आनंद आहे. लोकांना सेवा दिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान पाहून आपल्यालाही आनंद होतो. ही अनुभूती महत्त्वाची असते. शासनाने लोकांना प्रत्येक सेवा ही विहित कालमर्यादेत दिली जावी. दिली जाणारी सेवा ही पारदर्शक असावी तसेच ती देतांना सौजन्यशीलता असावी हे अपेक्षित आहे. शासकीय सेवा करतांना आपण ती लोकांच्या सेवेसाठी करीत आहोत ह्याचे भान प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकाऱ्यांनी असू द्यावे,असेही त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी खिरोळकर यांनी उपस्थितांना सेवा हक्क दिनाची शपथ दिली.

# पार्श्वगायिका ते महसूल सहायक अंजली बाबरचा यशस्वी प्रवास

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अंजणवती गावातील रहिवासी. परंतु, छत्रपती संभाजीनगर मधील रहिवासी सहायक पोलीस उपनिरीक्षक अशोक येडे पाटील यांची कन्या आणि मुख्याधिकारी (गट-अ) शशिकांत मारोती बाबर (मशाप्रसे) यांची पत्नी अंजली हिची नुकत्याच लागलेल्या एमपीएससी परीक्षेच्या निकालात बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा शाखेत महसूल सहायक म्हणून निवड झाली आहे. अंजली हिचे शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयात झालेले आहे. तिने एम. एस्सी (एन्व्हायरमेंट) पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरवात केली. गायन, पेंटिंग आणि स्केचिंग हे अंजलीचे छंद असून, मधल्या काळात तिने विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील गायनाचे कार्यक्रम केले आहेत.

तिने राज्यसेवा, गट ब व गट क अशा विविध मुख्य परीक्षा दिलेल्या आहेत. यापुढेही तिचा अभ्यास चालूच असून, राजपत्रीत अधिकारी होण्यासाठी ती प्रयत्नशील आहे. या निकालामुळे एक पायरी गाठली असली तरी अजून खूप पुढे जायचे आहे, असा तिचा निर्धार आहे. तिच्या ह्या निकालानंतर तिचे, कुटुंबीय, मित्र परिवार अशा सर्वच स्तरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### अक्षय तृतीयेचा मुहूर्त; बालविवाह विरोधी पथके सतर्क

# आपल्या जवळपास होणाऱ्या बालविवाहांची माहिती कळविण्याचे प्रशासनाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- अक्षय तृतीया हा सण बुधवार दि.३० रोजी आहे. या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी जिल्हा, तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे,असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यंत्रणांना दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण लक्षात घेता बालविवाह निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. या कृती दलाने बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार सर्व संबंधित विभागाच्या समन्वयाने जिल्ह्यात बालविवाह रोखण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दि.१ एप्रिल २०२४ ते आजपर्यंत एकूण ८८ बालविवाह या कृती दलामार्फत थांबविण्यात आले आहेत. चार प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग,नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यामध्ये बालविवाह निर्मूलनासाठी विविध जाणीव जागृतीपर उपक्रम घेऊन जनसामान्यांमध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्याची जाणीवजागृती व्हावी व बाल वयात बाल हक्कांपासून बालके वंचित राहू नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरू आहे.


दरम्यान या महिन्यात बुधवार दि.३० रोजी असणाऱ्या अक्षय तृतीया या सणाच्या शुभ मुहूर्तावर अनेक बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सगळे बालविवाह रोखण्याकरिता जिल्ह्यातील तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम२००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्ष व मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. असा विवाह केल्यास आयोजकांना अधिनियमानुसार एक लाख रुपये आर्थिक दंड व दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद किंवा दोन्ही शिक्षेचे प्रावधान आहे. तसेच ६ जून २०१३ (सुधारित २१.१०.२०२२) च्या शासन आधिसुचनेनुसार ग्रामपंचायतसाठी ग्रामसेवक व १८ ऑगस्ट २०१६ (सुधारित २१.१०.२०२२) च्या अधिसुचनेनुसार नागरी भागाकरिता बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित केले आहेत. जिल्ह्यामध्ये कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाइल्ड हेल्प लाइन १०९८ तसेच ११२ या मोफत हेल्प लाईन नंबरवर फोन करून द्यावी.माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. आपल्या नजिक होत असलेल्या बालविवाहाची माहिती नजीकचे पोलिस स्टेशन/ग्रामपंचायत कार्यालय/पंचायत समिती/बाल कल्याण समिती/जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे देखील तात्काळ संपर्क साधून द्यावी,असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी; चार तक्रारींचा तात्काळ निपटारा

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी या उपक्रमाअंतर्गत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी चार तक्रारींचा तात्काळ निपटारा केला. जिल्हाधिकारी स्वामी हे जिल्हा मुख्यालयातून जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संपर्कत होते. सिल्लोड येथे सोपन सुरमासे यांची जात प्रमाणपत्रा संदर्भात तसेच अमोल नगरे यांची जमीन नोंदणी संदर्भातील तक्रार होती. तसेच फुलंब्री तालुक्यातील मयुर जाधव यांची शिधापत्रिके संदर्भातील तक्रार व बाळू तावडे यांची ७-१२ वरील दुरुस्ती संदर्भात तक्रार होती. या तक्रारी ऐकून तात्काळ निपटारा करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी संबंधित तहसिलदारांना दिले. मुख्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांसमवेत निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड या उपस्थित होत्या तर सर्व तहसिलदार हे दुरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०४) नम्र विनंती

रा.स्व. संघानी राष्ट्रीय जीवनाचे पुनर्जागरण आणि पुनर्गठन करण्यासाठी संघटित - सजग प्रयत्न केले आहेत. व पुढेही नित्य करणार आहे. मानव कल्याण हा संघाचा आग्रह आहे. त्यासाठी मानव स्वयंसेवक निर्माण करणे हा उद्देश आहे. आणि राष्ट्राचा कायाकल्प घडवून आणणे हा हेतू आहे . संघाच्या माध्यमातून ध्येयपूर्तीचा हा यज्ञ डॉक्टर हेडगेवार यांनी सुरू केला होता. एक करोड पेक्षा जास्त प्रशिक्षित सदस्य, पन्नास लाखापेक्षा जास्त कार्यकर्ते; एक लाखापेक्षा जास्त दैनंदिन शाखा;

चाळीस देशांमध्ये हिंदू जनजागरण शाखा; आज कार्यरत आहेत. यापेक्षा जास्त व्हाव्यात अशी अपेक्षा आहे.

आज सारे ठ्ठड विरोधी नकली ठ्ठड वरअटॅक करतात. असली आरएसएस ते मुद्दामहून समजून घेत नाही. झोपी गेलेल्या जागे करू शकतो पण झोपेचे सोंग घेतलेल्या जागे करू शकत नाही.

आपल्या देशावर अनेक आक्रमणे झाली आणि त्या आक्रांतांनी आपल्यावर राज्य केले. हे कसे शक्य झाले; तर आपल्यामध्ये संघटना नव्हती- सजगता नव्हती. सारे हिंदू भाई भाई न म्हणता हिंदू मुस्लिम भाई भाई चा नारा घुमवून हिंदूंना जास्तीत जास्त असंघटित ठेवले. घाबरून कित्येक हिंदूंनी मुस्लिम धर्म स्वीकारला होता. तरीसुद्धा त्यांच्यात जातीभेदाचे विष पेरण्याचे काम धगधगते ठेवले. हिंदू मुस्लिम एकता बिन स्वराज्य नही हा नारा पण घुमत होता. डॉक्टर हेडगेवार धगधगत्या ज्वालामुखी सारखे जन्मजात देशभक्त होते. आणि तेव्हा त्यांच्या काळात आणि आज सुद्धा देशात भारतमातेसमोर नुसता गोंधळ मांडलेला आहे. तेव्हा हे भारत माते आज तूच आमच्यावर कृपा कर. अधर्म निर्दालूनी धर्मरक्षण कसे करायचे हे आम्हाला शिकव; अशी तुला आम्ही विनंती करत आहोत. महिषासुरदैत्य इथे पुन्हा मातला आहे; तेव्हा त्याचे मर्दन करण्याचा वसा / व्रत सर्वांनी घेण्याचे ठरवू दे. राष्ट्राप्रतीनिष्ठा सगळ्यांच्या मनात जागव. हे भारत माते आज मी तुलाच अशी नम्र विनंती करत आहे.

॥ भारत माता की जय ॥ क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ३५,५७७ कोटी रुपयांच्या न्यू बिझनेस प्रीमियमची नोंदणी

मुंबई : एसबीआय लाइफ इन्शुरन्स या देशातील आघाडीच्या जीवन विमा कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात ३५,५७७ कोटी रुपयांच्या न्यू बिझनेस प्रीमियमची नोंदणी झाल्याचे जाहीर केले आहे. त्याआधीच्या वर्षात म्हणजेच ३१ मार्च २०२४ रोजी ३८,२३८ कोटी रुपयांच्या न्यू बिझनेस प्रीमियमची नोंदणी केली होती. रेग्युलर प्रीमियम ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या तुलनेत ११ टक्क्यांनी वाढला आहे. प्रोटेक्शनवर लक्ष केंद्रित करत एसबीआय लाइफच्या प्रोटेक्शन न्यू बिझनेस प्रीमियम ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात ४०९५ कोटी रुपयांवर गेला आहे. प्रोटेक्शन इंडिव्हिज्युअल न्यू बिझनेस प्रीमियम ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात ७९३ कोटी रुपयांवर गेला आहे.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेचा निव्वळ नफा १,५२५ कोटी

मुंबई :आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, आमच्या ग्राहक ठेवींमध्ये वार्षिक २५% वाढ झाली असून, सीएएसए गुणोत्तर ५६.९% वर स्थिर आहे, जे आमच्या ठेवींच्या मजबुत संरचनेचे प्रतीक आहे. आमच्या निधीपुरवठा मालमत्तेमध्ये २०.४% वाढ झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे, बँकेची मालमत्ता गुणवत्ता मजबूत राहिली आहे, जिथे सकल अनुत्पादक मालमत्ता १.८७ % आणि निव्वळ अनुत्पादक मालमत्ता ०.५३% आहे. याशिवाय, वॉरबर्ग पिंकस एलएलसी ची एक संलग्न संस्था आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी च्या प्रायव्हेट इक्विटी विभागाची पूर्ण मालकीची उपकंपनी यांनी सुमारे ७,५०० कोटींची गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली आहे.

## महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार विचार मांडत आहेत

१ मे रोजी महाराष्ट्र दिन आहे आणि या महान राज्याचा समृद्ध इतिहास, येथील सांस्कृतिक विविधता आणि कला व चित्रपट सृष्टीला या राज्याने दिलेले योगदान यांचे स्मरण करून आनंद साजरा करण्यासाठी राज्यात तयारी सुरू आहे. सोनी सबचे कलाकार- जयेश मोरे, आदिश वैद्य, सायली साळुंखे, सुमित राघवन आणि आदित्य रेडिज सद्भावना व्यक्त करत आहेत आणि त्यांच्या जीवनात या राज्याचे काय महत्त्व आहे, याविषयी सांगत आहेत.

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
सिल्लोड यांचे न्यायालयात,

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९९/२०२५.

अर्जदार : १. नंदाबाई नामदेव पवार, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. अनाड, पोस्ट अजिंठा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर. २. सागर नामदेव पवार, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. संदीप नामदेव पवार, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधीकारी मौबाद

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नामदेव दिवाणसिंग पवार यांचा दिनांक ०३/०९/२०२४ रोजी अनाड, ता. सिल्लोड येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत नामदेव दिवाणसिंग पवार यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १०/६/२०२५

आदेशावरुन
विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय
सिल्लोड.)

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज, दाह, टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज व असहनीय वेदना इ. त्रास दूर करण्या करीता मदत करते.




अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.




UIN-MP 1724

वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co